
PRECISION
FOUNDATION
कृतज्ञता
प्रिसिजनची सामाजिक बांधिलकी!

PRECISION FOUNDATION

# कृतज्ञता

प्रिसिजनची सामाजिक बांधिलकी!

PRECISION
FOUNDATION

**खाजगी वितरणासाठी**

प्रकाशक
**प्रिसिजन फाऊंडेशन**

संकलन
**माधव देशपांडे**

**प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेड,**
डी ५, एमआयडीसी चिंचोळी,
सोलापूर. ४१३ २५५
संपर्क क्रमांक : ९१६८६४६५३१/३२/३३



उठा, जागे व्हा, आणि तोपर्यंत थांबू नका
जोपर्यंत तुम्ही तुमचं ध्येय साध्य करत नाही...

– स्वामी विवेकानंद



**यतिन शहा**
चेअरमन,
प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लि., सोलापूर

**शिक्षण, आरोग्य, सामाजिक प्रश्न, शाश्वत विकास, कला व संस्कृती या पाच क्षेत्रांमध्ये प्रिसिजन समूह कायमच कार्यरत राहणार आहे. वरवरची दुरूस्ती न करता एखाद्या प्रश्नावर कायमचा इलाज शोधण्याचाच आमचा प्रयत्न असेल.**

# व्यवसायासोबतच सामाजिक बांधिलकीचेही भान

**ज्या** समाजात आपण राहतो त्याचं आपण काहीतरी देणं लागतो. याच भावनेनं ज्या सोलापुरात प्रिसिजन कंपनी मोठी झाली त्या सोलापूरकरांच्या जीवनात बदल घडविण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्वाची जबाबदारी पार पाडण्यासाठी २००६ साली प्रिसिजन फाऊंडेशन ही विश्वस्त संस्था सुरू झाली. दहा वर्षांच्या वाटचालीनंतर आम्हाला आता सामाजिक कार्यही वाढवायचं आहे. व्यवसाय करत असतानाच प्रिसिजनला सामाजिक बांधिलकीही जपायची आहे.

नफा कमावणे हा कोणत्याही उद्योगाचा हेतू किंवा उद्दिष्ट असते. याच उद्देशाने चांगली माणसे एकत्र येतात आणि मेहनत करून व्यवसाय करतात. सामूहिक प्रयत्नांच्या बळावरच कोणतीही संस्था पुढे जात असते. मात्र स्वतःची प्रगती करत असतानाच समाजातील गरीब व गरजू व्यक्तींनाही मदत करायला हवी, हीच प्रिसिजनची सुरवातीपासूनची भावना आहे.

त्यामुळेच कंपनीने आपल्या नफ्यातील काही हिस्सा खर्चून समाजासाठी हितकारक उपक्रम राबविले व यापुढेही राबविणार आहे. रोजच्या जगण्यात आपल्याला अवतीभवती अनेक प्रश्न दिसतात. वेगवेगळ्या समस्यांनी सामान्य लोकांचे आयुष्य त्रासून गेलेले असते. हे चित्र बदलण्यासाठी त्यांना छोटीशी मदतही पुरेशी असते. लोकांच्या अशाच गरजा, अडचणी ओळखून त्या दूर करण्याचा प्रयत्न आम्ही प्रिसिजन फाऊंडेशनच्या माध्यमातून करत आहोत.

हे सगळं करण्यासाठी अक्षरशः शेकडो लोकांनी आपापल्या परीने मदत केली आहे. प्रिसिजनचे कर्मचारी घाम गाळून ग्राहकाला संतुष्ट करतात. नवनवीन ऑर्डर्स मिळवतात, नफा कमावतात. त्यामुळेच सामाजिक कार्यासाठीचा मोठा निधी उभा राहू शकतो. त्यामुळे अप्रत्यक्षरित्या का होईना, त्या सर्वांचा या सामाजिक कार्यात फार मोठा वाटा आहे. त्याचप्रमाणं वेगवेगळ्या क्षेत्रातल्या व्यक्ती, संस्थांनीही विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. प्रा. विलास बेत, सर फाऊंडेशन, जिल्हा परिषदेच्या शाळा, ग्रीनसोल, सरल डिझाईन्स, व्हॉईस ऑफ व्हॉईसलेस अभियान, ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान अशा कितीतरी जणांची नावे येथे सांगता येतील. सामाजिक कार्यासंबंधीच्या उपक्रमांमध्ये प्रिसिजनप्रमाणेच या संस्था आणि व्यक्तींनीही मनापासून सहभाग घेतला. सोलापूरातील प्रसारमाध्यमे, शासकीय/प्रशासकीय यंत्रणा यांनीही मोलाचे सहकार्य केले. या सर्वांचा परिणाम म्हणून प्रिसिजन फाऊंडेशन आता अनेकांना आधार वाटू लागली आहे.

शिक्षण, आरोग्य, सामाजिक प्रश्न, शाश्वत विकास आणि कला व संस्कृती या पाच क्षेत्रांमध्ये आम्ही यापुढे कायमच कार्यरत राहणार आहोत. वरवरची दुरूस्ती न करता एखाद्या प्रश्नावर कायमचा इलाज शोधण्याचाच आमचा प्रयत्न असेल. त्याला सर्वांनी साथ द्यावी हीच विनंती !



**डॉ. सुहासिनी शहा**
अध्यक्षा,
प्रिसिजन फाऊंडेशन, सोलापूर

**प्रिसिजन गप्पांमध्ये प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार आणि स्व. सुभाष रावजी शहा स्मृति पुरस्कार हे दरवर्षी दिले जातात. समाजोत्थानासाठी जीव ओतून काम करणाऱ्यांना १८ संस्थांना थोडंसं आर्थिक पाठबळ देऊन त्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्याचा प्रयत्न आम्ही केला.**

# समाजोत्थानासाठी झटणाऱ्यांप्रती कृतज्ञता...

कंपनीच्या मनुष्यबळासाठी विविध योजना राबवत असतानाच समाजाचं ऋण फेडण्यासाठीही प्रिसिजन फाऊंडेशननं २००६ साली काम सुरू केलं. कंपनी कायदा २०१३ अंतर्गत केंद्र सरकारने सीएसआर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) बंधनकारक केली. त्यामुळे फाऊंडेशनच्या कार्याला एक वेगळी दिशा मिळाली. यापुढे सोलापूरकरांच्या गरजा ओळखून उपक्रम राबविण्यावर प्रिसिजन फाऊंडेशनचा भर असेल.

सोलापूर जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रात ई लर्निंग ही अत्याधुनिक, तंत्रज्ञानाची कास धरणारी शिक्षण पद्धती रूजविण्याचा प्रयत्न प्रिसिजन करीत आहे. ई लर्निंग किट देण्यासाठी शाळांची निवड करताना शिक्षकांची इच्छाशक्ती आणि प्रयोगशीलता पाहण्यात आली. अवघ्या दीड वर्षात ई लर्निंग सुविधायुक्त शाळांची संख्या १०० च्या घरात पोहोचली आहे. पुढील काही वर्षे या शाळांवर पूर्णपणे लक्ष देऊन त्यांच्या गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

सरल डिझाईन्स या मुंबई येथील संस्थेच्या सहकार्यानं सप्टेंबर २०१७ मध्ये शालेय विद्यार्थिनींसाठी मासिक पाळीबद्दल प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविण्यात आला. हा पायलट प्रोजेक्ट होता. मात्र आता त्याची व्याप्ती पूर्ण जिल्हाभरात वाढविली जाणार आहे. विविध आजारांविषयी लोकांच्या शंकांचे समाधान व्हावे यासाठी सोलापूर आकाशवाणी केंद्राच्या सहकार्याने प्रिसिजन आरोग्य जागर हा उपक्रम राबविण्यात आला. त्याअंतर्गत आकाशवाणीवरून विविध विकारांमधील तज्ज्ञ डॉक्टरांच्या मुलाखती पार पडल्या. कर्णबधीरत्वाचे निदान बालपणीच करता यावे यासाठी फाऊंडेशननं या चाचणीसाठी अत्यावश्यक असणारी बेरा टेस्टिंग मशीन छत्रपती शिवाजी सर्वोपचार रूग्णालयात उपलब्ध करून दिली आहे.

कर्णबधीर मुलांना बालपणीच स्पीच थेरपी मिळाली तर ती मुकी होत नाहीत. शेटफळ येथील भांगे दांपत्य यासाठी कार्य करत आहे. त्यांच्या प्रकल्पाला प्रिसिजननं पाठबळ दिलं आहे. अंध-अपंगांना स्वावलंबी जीवन जगता यावं यादृष्टीनं बुधोडा जि. लातूर येथे रोजगारनिर्मिती करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मोहोळमधील भारतमाता आदिवासी पारधी विकास शाळेला आर्थिक मदत करून भटक्या विमुक्त जमातीतील मुलांच्या विकासासाठीही प्रिसिजन योगदान देत आहे. प्रिसिजन गप्पांच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा आर्थिक मदत देऊन गौरव केला जात आहे.

तापमानवाढ रोखण्यासाठी वृक्षसंवर्धन हा अत्यंत महत्वाचा उपाय आहे. त्यादृष्टीनं कंपनीनं आपल्या सर्व युनिट्समध्ये हिरवळ फुलवली आहे. ई लर्निंग सुविधायुक्त शाळांना प्रिसिजननं सोलर पॅनलही दिले आहेत. वीजेवरील अवलंबित्व कमी होऊन सौरउर्जेचा वापर वाढावा असा यामागचा उद्देश आहे. ग्रीनसोल या मुंबई येथील सामाजिक संस्थेच्या सहकार्यानं फाऊंडेशननं नुकताच एक अनोखा उपक्रम राबवला. सोलापूर जिल्ह्यातल्या गरजू विद्यार्थ्यांना पुनर्पक्रिया केलेल्या चपला मोफत वाटण्यात आल्या.

गेल्या आठ वर्षांपासून प्रिसिजन गप्पा हा तीन दिवसीय सांस्कृतिक कार्यक्रम दरवर्षी आयोजिला जात आहे. समाजसेवक आणि कलांवतांचं अंतरंग उलगडणारी गप्पांची ही मैफिल आता दशकपूर्तीच्या दिशेने जात आहे. स्वरांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या रसिक सोलापूरकरांसाठी गेल्या तीन वर्षांपासून प्रिसिजन संगीत महोत्सव आयोजिला जात आहे. पूर्णतः शास्त्रीय संगीताला वाहिलेला हा महोत्सव सोलापूरकरांच्या पसंतीस उतरला आहे. चित्रपट साक्षरता वाढविण्यासाठी फाऊंडेशननं सोलापूरात दोन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांचंही आयोजन केलं.

समाजात आपल्या अवतीभोवती अनेक माणसं, संस्था चांगलं काम करत असतात. त्यांना प्रोत्साहन देणं हे आपलं कर्तव्य आहे, या जाणीवेतून प्रिसिजन गप्पांमध्ये प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार आणि स्व. सुभाष रावजी शहा स्मृति पुरस्कार हे दरवर्षी दिले जातात. समाजोत्थानासाठी जीव ओतून काम करणाऱ्यांना १८ संस्थांना थोडंसं आर्थिक पाठबळ देऊन त्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्याचा प्रयत्न आम्ही केला. त्या संस्थांचं कार्य यानिमित्ताने तुमच्याशी शेअर करत आहोत...




# भावे रूग्णोपयोगी संस्था

स्वातंत्र्यपूर्व काळात माणसं आपल्या मनाशी एखादं ध्येय ठरवून त्यात सर्वस्व झोकून देत असत. कुणी देशाला स्वातंत्र्य मिळवण्याचं, कुणी स्त्री शिक्षण, अस्पृश्योध्दाराचं तर कुणी एखाद्या राजकीय विचारसरणीच्या प्रसाराचं काम मनापासून करी. कै. भावे गुरूजींनी गरीब आणि गरजू रूग्णांची हर तऱ्हेने सेवा करणे हे आपले जीवितकृत्य मानलं आणि आयुष्याची उणीपुरी ६५ वर्ष ते अव्याहतपणे चालवलं. ही कथा आहे सोलापुरातील 'भावे रूग्णोपयोगी संस्थेची. अर्थात पेशंटस् रिलिफ असोसिएशन.

सन १९३२ साली सोलापुरातील हरिभाई देवकरण प्रशालेतील विद्यार्थीप्रिय शिक्षक दत्तात्रय प्रभाकर भावे गुरूजींचे बंधू आजारी होते. त्यावेळी घरच्या सामान्य परिस्थितीमुळे यांच्यासाठी बर्फाची पिशवी खरेदी करणे शक्य नव्हते. इतर कुणाकडे ती आहे का, याचा शोधाशोध सुरू झाल्यानंतर त्यांच्याच एका सधन मित्राकडे केवळ बर्फाचीच पिशवी नव्हे तर बेडपॅन, युरिन पॉट अशा अनेक वस्तू धूळ खात पडून असल्याचे लक्षात आले. 'आपल्या बंधूच्या आजारपणात आलेल्या अडचणीवर मात करता आली कारण माझं समाजातलं स्थान.' इतर सामान्यजनांचे काय? असा प्रश्न पडला आणि या अस्वस्थतेतून भावे गुरूजींना रूग्णोपयोगी वस्तुंचा संग्रह करून त्या वस्तू गोरगरिब व मध्यमवर्गातील गरजू रूग्णांच्या सेवेसाठी अत्यल्प भाडे आकारून उपलब्ध करून देण्याची कल्पना सुचली. त्यातूनच 'भावे रूग्णोपयोगी संस्थे'चा जन्म झाला. गेल्या ८५ वर्षांपेक्षा अधिक काळ ही संस्था त्याच निष्ठेने आणि संवेदनशीलतेने काय करते आहे. आज संस्थेकडे ३०३५ प्रकारच्या चारशेहून अधिक रूग्णोपयोगी वस्तू आहेत. त्या अतिशय अल्प भाडे आकारून गरजू रूग्णांच्या उपयोगासाठी दिल्या जातात.

भावे गुरूजींची वृत्ती चौकस होती. काळानुरूप आणखीही सामाजिक गरजा लक्षात आल्या. त्यातून एकेक नव्या सेवा प्रकारांची संस्थेच्या कार्यात भर पडत गेली. रूग्णांचं स्पंजिंग, नियमित इंजेक्शने, एनिमा देणे अशा कामांबरोबरच थोडेफार वैद्यक जाणणाऱ्या माणसांना प्रशिक्षित करून त्यांनी अटेंडंट स्कीम सुरू केली. दर दिवशी चार आणे एवढ्या अल्प दराने सेवा देणे सुरू झाले. यातून रूग्णांची सोय झाली आणि गरजूंना चार पैसे मिळायला लागले. यथावकाश लोकवर्गणी करून संस्थेने १९५० साली स्वतःची इमारत उभी केली. प्रतिबंधक लसींचा प्रसार नसलेल्या काळात म्हणजे १९६२ सालच्या दरम्यान सोलापुरातील पहिले अशासकीय लसीकरण केंद्र सुरू करण्याचा मान याच संस्थेकडे जातो. क्षयरोग उपचार केंद्र १९६३ साली सुरू केले. १९७४ साली गुरूजींच्या पंचाहत्तीरीच्या समारंभात ४० हजार रूपयांची थैली




मिळाली. त्यातून 'भावे गुरूजी रक्तदान निधी' स्थापन केला.याच्या व्याजातून गरीब रूग्णांना रक्तपेढीतून रक्त घेताना जो सेवाभार द्यावा लागतो ते देण्यासाठी मदत केली जाऊ लागली. आरोग्य व्याख्यानमालेचा उपक्रमही अनेक वर्ष चालवला. भावे रूग्णोपयोगी संस्थेची १९७६ साली पुणे येथे शाखा सुरू केली. गुरूजींचे चिरंजीव रमेश भावे यांच्याकडे या शाखेची जबाबदारी सोपवली. कालांतराने त्यांनी दुसरी शाखाही सुरू केली. अशा रितीने पुण्यात दोन आणि सोलापुरात एक अशा तीन शाखा आहेत.

संस्थेच्या वतीने अत्यल्प खर्चात आरोग्याशी संबंधित सेवा पुरविल्या जातात. त्यामध्ये नाव नोंदणी व तपासणी-सल्ला, लघु तरंग उपचार, मानेच्या आणि कमरेच्या मणक्याचे कर्षण उपकरण, मेणाचा शेक, विद्युत लहरींच्या माध्यमातून मज्जारज्जू व स्नायूंचे उद्दीपन, आंतर्भेद विद्युतलहरी उपचार, ध्वनीतरंग उपचार, व्यायाम उपचार, विशेष व्यायाम उपचार, घरगुती करावयाचे व्यायाम आदींचा समावेश आहे.१० दिवसांच्या उपचाराकरिता २० टक्के सवलत दिली जाते. ६५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना प्रत्येक वेळी १० टक्के आणि पिवळे कार्ड धारक नागरिकांना ५० टक्के सवलत मिळते. विशेष म्हणजे विकलांग रूग्णांसाठी घरपोच सेवाही उपलब्ध करून दिली जाते.

दिग्गजांच्या भेटीः

भावे रूग्णोपयोगी संस्थेला राजकीय, सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गजांनी भेटी दिल्यात. तत्कालीन पंतप्रधान मोरारजीभाई देसाई, राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद, डॉ. राधाकृष्णन, डॉ. झाकीर हुसेन या तीन राष्ट्रपतींनी भेटी दिल्या. १९६६ साली इंदिरा गांधीं, ग्यानी झैलसिंग यांनी भेटी दिल्या. आचार्य विनोबा भावे, पॉली उम्रीगर, शंतनुराव व शंकरराव किर्लोस्कर, बाबा आमटे अशा अनेक दिग्गजांनी भेटी दिल्या. स्व. अटलबिहारी वाजपेयींनीही सोलापूरच्या दौऱ्यात भावे रूग्णोपयोगी संस्थेला भेट दिली. १९९४ च्या आसपास भावे गुरूजींची प्रकृती अगदीच खालावली. त्यादरम्यान पं. शंकरदयाल शर्मानीही आवर्जून भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली.

आगामी योजना :

यापुढील काळात अत्याधुनिक असे फिजिओथेरपी सेंटर सुरू करण्याचा मानस आहे. त्यामाध्यमातून रूग्णांसाठी सर्वोत्तम सेवा दिली जाईल. महागड्या वैद्यकीय तपासण्या अल्प खर्चात उपलब्ध करून देण्याचा तसेच सेवाभावी डॉक्टरांच्या मदतीने सामान्य रूग्णांना स्पेशालिस्ट, सुपर स्पेशालिस्ट कन्सल्टेशन देण्याचा संस्थेचा विचार आहे. संस्थेची इमारत बरीच जुनी झालेली आहे. तिला कालानुरूप नवे रूप देण्याची योजना आहे. त्यातून संस्थेस आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देता येईल. रक्तदानासारख्या सेवांची व्याप्ती वाढवण्याची योजना आहे.

प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार :

२००९ साली 'प्रिसिजन गप्पा' कार्यक्रमात दिला जाणारा पहिला 'प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार' या संस्थेस देण्यात आला. दिनांक २६ नोव्हेंबर २००९ रोजी



झालेल्या पुरस्कार सोहळ्यात कवि ग्रेस यांच्या हस्ते आणि सोलापूरचे तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. जगदीश पाटील यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार देण्यात आला. एक लाख रूपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. रूग्णोपयोगी संस्थेचे तत्कालीन सचिव डॉ. एस एस रासकर यांनी संस्थेच्या वतीने पुरस्कार स्वीकारला.

कालान्तराने तत्कालीन सेक्रेटरी डॉ. रासकर यांच्या निधनानंतर संस्थेच्या कार्यकारिणीत बदल होऊन नवीन कार्यकारिणी अस्तित्वात आली आहे. श्री चंद्रकांत कुलकर्णी हे मॅनेजिंग प्रेसिडेंट तर श्री प्रकाश मोडक हे सेक्रेटरी म्हणून काम पाहतायत. रमेश दत्तात्रय भावे, सौ ललिता रमेश भावे, श्री विश्वास विनायक दाते, सुर्यकांत रघुनाथ शिर्के, माधव लक्ष्मण दीक्षित, सत्यनारायण गुंडला, चंद्रशेखर मणेरीकर आदी मंडळी संस्थेचे विश्वस्त आहेत. श्री वासुदेव राजाराम पटवर्धन आणि माधव कोरवार हे सल्लागार आहेत.

संस्थेचे नाव : भावे रूग्णोपयोगी संस्था / वस्तुसंग्रह (पेशंट्स रिलिफ असोसिएशन)
पत्ता : १५ सी, गोल्डफिंच पेठ, सरस्वती बुक डेपोच्या मागे, सोलापूर.
संपर्क : चंद्रकांत कुलकर्णी (९४०३८४९८५४, ७३५०००६१३८, ०२१७-२७२७०७८)
नोंदणी वर्ष : ३० ऑक्टोबर १९३२
नोंदणी क्रमांक : एफ / ९, सोलापूर
बँक खाते व क्रमांक : बँक ऑफ महाराष्ट्र (२००६३२०२७३३)
आयएफएससी कोड : MAHB0000017
ई मेल : prasolapur1953@gmail.com



# माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान

'ग्रामीण कुटुंबाच्या सक्षमीकरणातून स्वावलंबी समाज निर्मितीचा संकल्प' हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून माताबालक उत्कर्ष प्रतिष्ठान गेली ४० वर्षे काम करते आहे. शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्वावलंबन, अत्याचाराविरूध्द संघर्ष आणि पर्यावरण साक्षरता या पंचसूत्रीमध्ये माताबालक उत्कर्ष प्रतिष्ठानचे विविध उपक्रम गुंफले गेले आहेत.

सन २००८ पासून सुरू झालेला 'आरोग्यदूत' हा फिरता दवाखाना, सन २००७ पासून 'नाबार्ड' च्या सहकार्याने पारंपारिक लोकर व्यवसायाच्या ऊर्जितावस्थेसाठी सुरू असलेला घोंगडी क्लस्टर विकास प्रकल्प, १९९६ पासून चालू असलेले स्वयंसहाय्यता गट, सखी सहेली मंच, सन १९९० पासून सुरू असलेली महिला अन्याय निवारण समिती व मैत्रीण कुटुंब सल्ला केंद्र, सन १९८३ पासून सुरू असलेले उत्कर्ष बालक मंदिर, उत्कर्ष माध्यमिक विद्यालय, विविध शाळाबाह्य उपक्रम, उत्कर्ष कला मंच अशा अनेक उपक्रमांच्या आणि प्रकल्पाच्या माध्यमातून संस्थेचे कार्य चालते.

'आरोग्यदूत' हा गरोदर महिला आणि बालकांसाठी तसेच ग्रामीण जनतेच्या आरोग्यासाठी सुरू केलेला विशेष उपक्रम. संस्थेच्या माध्यमातून चालणारा हा आरोग्यसेवेचा उपक्रम कोणत्याही प्रकारच्या आरोग्य सुविधा नसलेल्या तालुक्यातील सात गावांमधून चालतो. या आरोग्यदूतमधून २ डॉक्टर्स, २ आरोग्यसेविका गावातील लोकांच्या आरोग्याची तपासणी करतात. तपासणीनंतर आवश्यक तो औषधोपचार, आरोग्य सल्ला दिला जातो. प्रत्येक दिवशी एकच गाव केल्याने रूग्णांना पुरेसा वेळ दिला जातो. ग्रामीण भागातल्या लोकांसाठी 'आरोग्यदूत' ही योजना खरोखरच 'देवदूता'प्रमाणे उपयुक्त ठरली आहे.

आरोग्यदूतच्या बरोबरीने त्याच वाहनातून छंदवर्ग शिक्षिका, बचतगट व्यवस्थापिका, मैत्रीण कुटुंब सल्ला केंद्राच्या समुपदेशक यादेखील जातात. महिलांसाठी आर्थिक स्वावलंबनाचे, मुक्त विद्या केंद्राचे व छंदवर्गाचे उपक्रम राबवित असतात. दरवर्षी सरासरी अंदाजे दीड हजार ते दोन हजार रूग्णांची नियमित तपासणी केली जाते. ज्यात गरोदर स्त्रिया, मुले, वृध्दांचा समावेश असतो. महिलांमध्ये हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी असते. त्यामुळे त्यांची हिमोग्लोबिन तपासणी करून योग्य तो आहार सल्ला दिला जातो. एक वर्षाच्या आतील बालकांची विशेष नोंदणी करण्यासाठी गावागावांमधून महिला मेळाव्यांचे आयोजन केले जाते. प्रथमोपचार पेट्यांचे वाटप केले जाते. काही वेळा मोठया दवाखान्यात उपचार घेणे गरजेचे असते, तेव्हा महिलांच्या आर्थिक



अडचणींचा विचार करून 'आरोग्य कोष' सुरू करण्यात आला आहे. संस्थेच्या आजवरच्या 'आरोग्य' विषयक सेवेची दखल घेऊन पुणे येथील द्वारका संगमनेर मेडिकल फऊंडेशनने ग्रामीण भागातील उल्लेखनीय कार्यासाठी 'शतायुषी' हा सर्वोत्कष्ट आरोग्यसेवा आणि शिक्षणासंबंधीचा पुरस्कार दिला.

त्याशिवाय, नॅब संस्थेच्या सहकार्याने नेत्ररोग तपासणी शिबिरांचे आयोजन केले जाते. रूग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून त्यांना चष्म्याचे वाटप केले जाते. दरवर्षी महिलांच्या रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण तपासून त्यांना लोहयुक्त गोळ्या, शेंगदाणे व गूळ याचे वाटप केले जाते. आरोग्यसेवेपासून दूर असणाऱ्या वस्त्यांवर प्रथमोपचार पेट्यांचे वाटप करून त्याच्या वापराबाबत प्रशिक्षण व माहिती दिली जाते.

घोंगडी क्लस्टर विकास प्रकल्प :

माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठानच्या माध्यमातून घोंगडी विणकर, जेन कामगार, सूत कातणाऱ्या महिला व मेंढपाळांसाठी काम करून त्यांचा जीवनस्तर उंचावण्याचाही प्रयत्न केला जातो. तसेच घोंगडी कारागिरांची पारंपारिक कौशल्ये विकसित होण्यासाठी डिझाईन डेव्हलपमेंट कार्यशाळा आयोजित केल्या जातात. १५ दिवसांच्या या कार्यशाळांमध्ये घोंगडी विणकरांना विविध नमुन्यात घोंगडी विणण्याचे प्रशिक्षण दिले जाते. महाराष्ट्रातील विविध विभागात आयोजित प्रदर्शनांमध्ये सहभाग नोंदवून विक्री आणि विक्री कौशल्य वाढवण्याचा प्रयत्न केला जातो.

विविध उपक्रम :

संस्थेच्या माध्यमातून चालणारे विविध प्रकल्पही तितकेच महत्वाचे आहेत. कुटुंब सल्ला केंद्राच्या माध्यमातून अन्यायग्रस्त महिलांच्या तक्रारींची दखल घेऊन त्याचे निराकरण केले जाते. वर्षभरात साधारणतः १२५ ते १५० तक्रारींवर समुपदेशनाच्या माध्यमातून मार्ग काढले जातात. यशस्वी कार्यवाहीनंतर प्रपंच सुरळीत सुरू झालेल्या पतिपत्नींच्या प्रकट मुलाखती 'नांदा सौख्यभरे' अशा मेळाव्याच्या माध्यमातून घेतल्या जातात. मैत्रीण कुटुंब सल्ला केंद्राचे कार्य सांगोला आणि मंगळवेढा या तालुक्यांमधून चालते. या केंद्राच्या माध्यमातून आजपर्यंत अनुक्रमे २६२१ आणि ६१२ तक्रार अर्ज नोंदणी झाले आहेत. त्यातील ६० टक्के अर्जदारांचे संसार पुन्हा सुरू झाले आहेत, हे विशेष.

१०५ बचतगटांच्या माध्यमातून तसेच वेगवेगळ्या व्यवसाय प्रशिक्षणांमधून महिला आत्मनिर्भर होत आहेत. २०१७-१८ या आर्थिक वर्षात बचतगटांनी रूपये १ कोटीपेक्षाही अधिक रकमेची उलाढाल केली. संस्थेने आजवर चार हजारांपेक्षाही अधिक महिलांना शेळीपालनापासून टॅली-९ पर्यंत ३२ प्रकारची व्यवसाय प्रशिक्षणे दिली आहेत. सांगोला तालुक्यात जवळपास १० ठिकाणी सुरू असलेल्या किशोरी विकास वर्गाच्या माध्यमातून अडीचशे किशोरवयीन मुलींना दिशादर्शन सुरू आहे.

उत्कर्ष बालक मंदिर ही शाळा इयत्ता दहावीपर्यंतचे शिक्षण देते. त्यामध्ये एकूण ३०



प्रशस्त अध्यापन कक्ष, अवांतर वाचनासाठी पुस्तके व दृकश्राव्य साधने, सायन्स लॅबोरेटरी, संगणक कक्ष, क्रीडांगण, संगीत कक्ष, कला दालन, व्हिजुअल रूम ही शाळेची वैशिष्ट्ये आहेत. सोलापूर जिल्ह्यातील एकमेव इंग्लिश लँग्वेज लॅब हा उपक्रम याच शाळेत सुरू आहे.

सांगोला शहरासह तालुक्यातील २८ गावांमध्ये प्रतिष्ठानचे कार्य चालते. एकूणच माताबालक उत्कर्ष प्रतिष्ठानचे आरोग्य, महिला सक्षमीकरण, किशोरी विकास, महिला उद्योजकता अशा विषयांमध्ये कल्पकतेने, उत्साहाने, कळकळीने कार्य चालते. या सर्व उपक्रमांच्या माध्यमातून महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना स्वयंपूर्ण करतानाच एक 'माणूस' म्हणून उन्नत करण्याची धडपड यापाठीमागे आहे. या धडपडीची दखल घेत सकाळ माध्यम समूहाचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या हस्ते २०१० सालचा प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार संस्थेला देण्यात आला.

संस्थेचे नाव : माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान
पत्ता : देशपांडे गल्ली, केळकर हॉस्पिटलसमोर, ता. सांगोला, जि. सोलापूर.
संपर्क : संजीवनी केळकर (९४२१०६३८२६)
नोंदणी क्रमांक : एफ ७८१
बँकेचे नाव व खाते क्रमांक : बँक ऑफ महाराष्ट्र (६००४६८५७२०५)
आयएफएससी कोड : MAHB0001467
वेबसाईट : www.matabalak.org
ई मेल : matabalak.utkarshapratishthan@gmail.com




# भारतमाता प्रतिष्ठान

भारतमाता आदिवासी पारधी समाज व भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान, ता. मोहोळ, जि. सोलापूर ही संस्था १९९७ साली नोंदणीकृत झाली. या संस्थेच्या वतीने मोहोळ तालुक्यासह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील आदिवासी पारधी समाजाकरित तसेच भटके विमुक्त समाजाकरिता संघटनात्मक, शैक्षणिक, सामाजिक कार्य केले जात आहे. आदिवासी पारधी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, पोलिस दलाच्या मनातील या समाजाविषयीची प्रतिमा बदलण्यासाठी ही संस्था प्रयत्नशील आहे.

सोलापूर जिल्ह्यातील २९० गावांमध्ये हा समाज मोठ्या प्रमाणावर आहे. जागरूकता नसल्याने तसेच शिक्षणाच्या अभावामुळे आदिवासी पारधी समाज हा शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यापासून वंचित राहिला आहे. या योजनांचे कार्य समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न संस्थेमार्फत केला जातो. पारधी समाजाला हक्काचे गांव व घरे मिळावीत यासाठी शासन दरबारी पाठपुरावा केला जातो. सोलापूर जिल्ह्यातील सय्यद वरवडे, बोराळे, आरबळी, मंगळवेढा, कुर्डूवाडी, माढा येथील अनेक गावांमधून घरकूल योजनेमार्फत एक हजारापेक्षाही जास्त व्यक्तींना हक्काची घरे मिळवून देण्यात संस्थेला यश आले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील आदिवासी पारधी समाज तसेच भटके विमुक्त प्रवर्गातील नाथपंथी डवरी गोसावी, मरीआईवाले, डोंबारी, बहुरूपी, वैदू अशा अनेक समाजांकडे जातीचे दाखले, रेशनकार्ड आदी कागदपत्रांपासून वंचित आहेत. मतदान याद्यांमध्येही त्यांची नावे नाहीत. याबाबत संस्थेतर्फे जनजागृती केली जात आहे. आदिवासी पारधी समाजातील महिलांच्या हाताला काम मिळावे या उद्देशाने लघुउद्योग उभारण्यासाठी मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले जाते. सोलापूर जिल्ह्याचे माजी जिल्हाधिकारी जगदीश पाटील यांच्या सहकार्याने संस्थेने काही वर्षांपूर्वी आदिवासी पारधी समाजाचे सर्व्हेक्षण केले. त्याअंतर्गत जिल्ह्यातील २९० गावांमधील ३५ हजारांपेक्षा अधिक लोकांना विविध शासकीय दाखले घरपोच देण्यात आले.

आदिवासी पारधी समाज हा रानावनात भटकणारा समाज आहे. स्थिरता नसल्याने हा समाज शिक्षणापासून वंचित आहे. शिक्षण नसल्यामुळे त्यांच्या प्रगतीला अडथळा निर्माण झाला आहे, हे ओळखून संस्थेतर्फे शैक्षणिक विकासाचे प्रयत्न सुरू आहेत. या समाजातील मुलांकडे पाहण्याचा शासनाचा, पोलिस दलाचा तसेच सर्वसामान्य इतर घटकांचा दृष्टीकोन नकारात्मक असतो, हे संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर भोसले व उपाध्यक्षा ॲड. अपर्णा रामतीर्थकर यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी या समाजातील मुलांसाठी मोहोळमधील दत्तनगर येथे आश्रमशाळा सुरू करण्याचा निर्णय



घेतला.

यासाठी २००९ मध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी जगदीश पाटील यांच्या पुढाकारातून १० गुंठे जागा मिळाली. सुरवातीला १० मुले या आश्रमशाळेत दाखल झाली. २०१० मध्ये ३३, २०११ मध्ये ६२, २०१२ मध्ये ७२, २०१३ मध्ये १२० या प्रमाणे उत्तरोत्तर ही संख्या वाढतच चालली आहे. सध्या ५५ मुली व ६५ मुले या आश्रमशाळेत राहत आहेत. केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांच्या सहकार्याने संस्थेला इमारतीसाठी २५ लाखांचा मदतनिधी मिळाला. या आश्रमशाळेतील ७५ विद्यार्थी हे मोहोळमधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये इयत्ता पहिली ते चौथीचे शिक्षण घेत आहेत. तर ४५ विद्यार्थी हे मोहोळमधील नागनाथ विद्यालयामध्ये इयत्ता पाचवी ते आठवीचे शिक्षण घेत आहेत.

आश्रमशाळेतील सर्व विद्यार्थ्यांना दोन वेळचा नाष्टा, दोन वेळचे जेवण, अंघोळीसाठी गरम पाण्याची सोय तसेच दैनंदिन आयुष्यासाठी लागणाऱ्या सर्व सुविधा संस्थेतर्फे पुरविल्या जातात. ज्ञानेश्वर भोसले यांच्यासह एकूण आठ जणांची टीम यासाठी पूर्णवेळ कार्यरत आहे. संस्थेला प्रतिमहिना रूपये ९६ हजार इतका खर्च येतो. प्रिसिजन फाऊंडेशनतर्फे सालापासून संस्थेला वर्षभर लागणारे रेशनचा पुरवठा केला जातो.

प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार २०११ : संस्थेने केलेल्या कार्याची दखल घेऊन २०११ सालचा प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार ज्येष्ठ समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे व डॉ. मंदा आमटे यांच्या हस्ते देण्यात आला.

संस्थेचे नाव : भारतमाता आदिवासी पारधी समाज व भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान
पत्ता : भारतमाता आदिवासी पारधी वसतीगृह, दत्तनगर, मोहोळ, जि. सोलापूर. ४१३२१३
संपर्क : ज्ञानेश्वर भोसले (९९२३९६९१९८)
नोंदणी वर्ष : १ जून १९९७
नोंदणी क्रमांक : एफ १९५५
बँकेचे नाव व खाते क्रमांक : स्टेट बँक ऑफ इंडिया (३१०५११७३९७२)
आयएफएससी कोड : SBIN0000288
ई मेल : dnyaneshwarbhosale1975@gmail.com



# लोकबिरादरी प्रकल्प

'बाबा आमटे' नाव उच्चरताच आपण आदराने नतमस्तक होतो. लोकबिरादरी प्रकल्पाची कल्पना बाबांना सुचली ती एका साहसी सहलीच्या दरम्यान. डॉक्टरकीची शेवटची परीक्षा देऊन बाबांची दोन्ही मुलं' डॉ. प्रकाश आणि डॉ. विकस' जेंव्हा सुट्टीसाठी घरी परतली तेंव्हा बाबांनी त्यांना भामरागडला सहलीच्या निमित्ताने घेऊन आले. जेमतेम २५० किमी चा रस्ता पार करायला जवळपास तीन दिवस लागले. यादरम्यान तिथल्या आदिवासी समाजाची हलाखीची परिस्थिती अस्वस्थ करत होती. या दुर्गम भागात माडिया गोंड ही आदिवासी जमात तिथे वास्तव्य करून आहे. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य या मूलभूत गोष्टींपासून हजारो कोस दूर असणाऱ्या समाजासाठी काही करावे या ध्येयाने बाबांना पछाडले. वयाच्या साठाव्या वर्षी बाबांची ही जिगर पाहून डॉ. प्रकाश आमटेंनी तिथे प्रकल्प उभारण्याचा आणि त्यासाठी आयुष्य वेचण्याचा निर्णय घेतला. डॉ. प्रकाशजींची धाकटी बहीण रेणुका आणि त्यांच्या चार तरूण साथीदारांनी त्यास हातभार लावला आणि त्यातून सुरू झाला आदिवासींच्या जीवनोध्दाराचा एक महायज्ञ!

एमबीबीएसच्या शेवटच्या वर्षाला असताना एक तरून या घनदाट अरण्यात शिरला तोच मुळी पुन्हा कधीही न परतण्यासाठी! जिथे रोजचं जगणं हेच एक मोठं आव्हान होतं तिथे अथक प्रयत्नांनी एक विश्व उभं करण्याचं काम डॉ. प्रकाश आमटे आणि डॉ. मंदाकिनी आमटे यांनी केलं. अनेक वन्यजीवांच्या अधिवासाने, उंचच उंच घनदाट झाडींनी, खळाळणाऱ्या नद्यांनी नटलेला हा भूप्रदेश आहे. ७५% भूभाग या झाडींनी व्यापाला आहे. तिथे मनुष्यवस्तीच्या खुणा अनेक वर्ष सापडत नव्हत्या. शतकानुशतके तिथे वास्तव्यास असणारा माडिया गोंड या आदिवासी समाजाला भूख, अनारोग्य, अंधश्रध्देचा कालकोठडीतून बाहेर काढण्याचा निश्चय करूनच या प्रकल्पाला सुरूवात झाली.

लोकबिरादरीचे उपक्रम :

दवाखाना : या आदिवासी समाजाचं अनारोग्य हीच सर्वात भीषण समस्या होती. या लोकांची भाषा वेगळी. मुळात संवाद साधणेच अवघड होते. त्यानंतर यांचा विश्वास संपादन करणे आवश्यक होते. आजारपण आले की बाबा, वैदू यांच्याकडे जाऊन मंत्रतंत्र, बलि चढवणे अशा गोष्टींची सवय असलेला समाज औषधोपचार कसा घेईल ही सर्वात मोठी समस्या होती. प्रकल्पात सुविधा नव्हत्या. मनुष्यबळ कमी होते. वीजदेखील नव्हती. संयमाची परीक्षा पाहणाऱ्या या काळाने डॉ. प्रकाश आणि डॉ. मंदाकिनी, त्यांचे सर्व सहकारी तावूनसुलाखून निघाले. आज सर्व प्रकारची



अत्याधुनिक वैद्यकीय सेवा तिथे दिली जाते. एवढ्या वर्षाच्या अथक प्रयत्नांनी 'लोकबिरादरी प्रकल्पा'चा हा दवाखाना लोकांसाठी जीवनदायिनी बनला आहे.

शाळा : शिक्षणापासून कोसो दूर असलेल्या या समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणणे गरजेचे होते. जंगलाबाहेरच्या विश्वाशी यांचा काही संपर्कच नव्हता. तो शिक्षणाने निर्माण होऊ शकतो. म्हणून शाळा सुरू केली. दारोदारी जाऊन पालकांना विश्वासात घेऊन त्यांना शिक्षणाचं महत्व पटवून देत अवघ्या २५ मुलांच्या सहाय्याने सुरू झालेली शाळा आता बालवाडी ते बारावी पर्यंत ६५० विद्यार्थी शिक्षण घेतात. ५५० हून अधिक विद्यार्थी वसतिगृहात राहून शिकतात. १९७६ च्या तुकडीतला 'कन्ना मडावी' हा या जमातीतला पहिला डॉक्टर बाहेर पडला. डॉ. प्रकाश आणि डॉ. मंदाकिनी यांची मुलं डॉ. दिगंत आणि अनिकेत ही अनुक्रमे डॉक्टर आणि अभियंता झाले. हेमलकसा केंद्राच्या आसपासच्या जवळपास १८ गावांमध्ये जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत. पण शिक्षक येत नाहीत. रस्ते नाहीत. कोणत्याही सुविधा नाहीत. अशा ठिकाणी २०१५ साली 'साधना विद्यालय' सुरू करण्यात आले.

प्राणी अनाथालय : हे प्राणी अनाथालय म्हणजे लोक बिरादरी प्रकल्पाचं आगळंवेगळं वैशिष्ट्य आहे. या अनाथालयात जवळपास ११५ प्राणी आहेत. आदिवासी समाज शेती करत नाही. वन्य प्राण्यांची शिकार करूनच उदरनिर्वाह चालतो. या वन्य प्राण्यांच्या संरक्षणासाठी लोकबिरादरीने हे अनाथालय सुरू केले. देशातील एकमेव असे हे प्राणी अनाथालय असावे. डॉ. प्रकाश आमटेंच्या प्राणीप्रेमाच्या अनेक कहाण्या इथे प्रत्यक्ष पाहायला मिळतात. इथल्या सगळ्या प्राण्यांची अत्यंत मायेने काळजी घेणारी डॉ. प्रकाश आमटेंसह आठ कार्यकर्त्यांची टीम आहे.

याशिवाय, ग्रामविकासाचे अनेक उपक्रम इथे राबवले जातात. तलाव खोदून जलसंधारणाच्या सोयी निर्माण करणे, शेतीचे तंत्रज्ञान लोकांपर्यंत पोहोचवणे, दारूबंदी, गुटखा, तंबाखूबंदी, वृक्षतोड बंदी, वृक्षारोपण आणि संवर्धन अशा अनेक माध्यमातून ग्रामविकासासाठी प्रयत्न केले जातात.

डॉ. प्रकाश आमटे आणि डॉ. मंदाकिनी आमटे या दाम्पत्याच्या बरोबरीने त्याचे चिरंजीव डॉ. दिगंत आमटे आणि त्यांच्या पत्नी डॉ. अनघा आमटे हे दोघे आता प्रकल्पातील आरोग्यसेवेची जबाबदारी हाताळत आहेत. तर अनिकेत आमटे आणि सौ. समीक्षा आमटे या दोघांनी शिक्षण आणि ग्रामविकासाचा विडा उचलला आहे. एका अर्थी एकाच ध्येयाने पछाडलेली बाबा आमटे आणि साधना आमटे यांची तिसरी पिढीदेखील या कार्यात उतरलेली आहे. पिढ्यान्‌पिढ्या वारसा चालणारं हे कदाचित एकमेव समाजसेवेचं केंद्र असावं.

स्व. सुभाष रावजी पुरस्कार :

हेमलकसाच्या या 'लोकबिरादरी प्रकल्पा'ची जबाबदारी आणि वारसा तितक्याच समर्थपणे सांभाळणाऱ्या डॉ. दिगंत आणि डॉ. अनघा आमटे यांन सन २०१२ चा स्व.



सुभाष रावजी शहा स्मृति पुरस्कार देण्यात आला. एक लाख रूपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. डॉ. प्रकाश आणि डॉ. मंदा आमटे, डॉ. दिगंत व डॉ. अनघा आमटे आणि त्यांची मुले यांच्या रूपाने आमटे परिवारातील तीन पिढ्या एकाच वेळी या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. हे देखील त्या वर्षीच्या पुरस्कार सोहळ्याचं एक आगळंवेगळं वैशिष्ट्य म्हणता येईल.

संस्थेचे नाव : लोकबिरादरी प्रकल्प, हेमलकसा ता. भामरागड जि. गडचिरोली. ४४२७१०
पत्ता : महारोगी सेवा समिती, आनंदवन, वरोरा ता. वरोरा, जि. चंद्रपूर. ४४२९१४
संपर्क : सचिन मुक्कावर (७५८८७७२८५८)
बँकेचे नाव व खाते क्रमांक : स्टेट बँक ऑफ इंडिया (२०२४८२३८८२३)
आयएफएससी कोड : MAHB0001108
वेबसाईट : lokbiradariprakalp.org
ई मेल : hemalkasa1973@gmail.com




# प्रभा–हिरा प्रतिष्ठान

पंधरा वर्षांपूर्वी एचआयव्ही एड्स हे शब्द कानावर पडले की लोक नाक मुरडत असत. मात्र सरकारी तसेच स्वयंसेवी संस्थांच्या यंत्रणांनी गेल्या काही वर्षांमध्ये अब्जावधी रूपये खर्चून हे चित्र बदलण्याचा प्रयत्न केला. या आजाराबद्दल सर्वसामान्य माणसाच्या मनातील गैरसमज मोडून काढण्यासाठी जनजागृती केली. नॅशनल एड्स कंट्रोल ऑर्गनायझेशन (नॅको) आणि राज्य एड्स नियंत्रण संस्थांनी या आजाराबाबत समाजात असलेला 'सामाजिक कलंक' अर्थात 'सोशल स्टिग्मा' हा दृढ समज खोडून काढण्यासाठी नेटाने प्रयत्न केले. परिणामी दरवर्षी एचआयव्ही संसर्गित रूग्णांच्या संख्येत पडणारी भर कमी झाली. पण एचआयव्हीच्या राक्षसाशी लढायचं असेल तर यापेक्षाही अधिक काहीतरी करणं गरजेचं होतं. संसर्गित व्यक्तींचं आरोग्य, आहार, शिक्षण, त्यांना सामाजिक–मानसिक पाठिंबा देणं, स्वावलंबी बनवणं गरजेचं होतं. हेच स्वप्न पंढरपूरच्या मंगलताई शहा यांनी पाहिलं आणि त्यातून एचआयव्हीग्रस्त बालकांच्या आयुष्याला पालवी फुटली.

एचआयव्हीग्रस्त बालके ही कचराकुंडी, एस.टी. स्टॅण्ड, रेल्वे स्टेशन, स्मशानभूमी, आरोग्य केंद्रे, पोलिस स्टेशन अशा ठिकाणी सोडून दिली जातात. अशा अनाथ बालकांच्या पुनर्वसनासाठी पंढरपूर येथील श्रीमती मंगलताई शहा उभ्या राहिल्या. त्यांनी एचआयव्ही संसर्गितांसाठी शाळा आणि महिला–मुलांचे पुनर्वसन केंद्र चालविण्याचे स्वप्न पाहिले. त्यासाठी त्यांनी आपली मुलगी सौ. डिंपल घाडगे हिच्या साथीने १५ ऑगस्ट २००१ रोजी प्रभा–हिरा प्रतिष्ठानची स्थापना केली. या संस्थेत प्रारंभी केवळ तीन अनाथ एचआयव्ही संसर्गित मुले दाखल झाली. पंढरपूर–कराड रस्त्यावर पालवी हा प्रकल्प सुरू झाला. शहा मायलेकीने १६ वर्षांपूर्वी सुरू केलेल्या या प्रकल्पाने आता मोठा आकार घेतला आहे. पंढरपूर आणि परिसरातील एचआयव्हीच्या दुर्धर आजाराने पछाडलेल्या अनाथ बालकांना, मुलांना आणि महिलांना पालवी प्रकल्प म्हणजे हक्काचे, मायेचे, सुरक्षित घर बनले आहे.

हा प्रकल्प चालविताना शहा कुटुंबियांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. एचआयव्ही संसर्गितांच्या राहण्यासाठी, शाळेसाठी इमारतीचा, भोजनाचा, दैनंदिन खर्चाचा आणि प्रामुख्याने संस्थेत दाखल होणाऱ्या सर्वांच्या उपचाराचा प्रश्न सोडविणे जिकीरीचे होते. मात्र ध्येयाने प्रेरित झालेल्या मंगलताईंची जिद्द पाहून हळूहळू मदतीचे हात वेगवेगळ्या स्वरूपात पुढे येऊ लागले. आज पालवीत ७२ मुली आणि ३८ मुले अशा ११० एचआयव्ही संसर्गित अनाथ मुलांसह १० संसर्गित महिलांचीही सोय झाली आहे. त्यांच्या निवासाची, भोजनाची आणि उपचाराची सोय संस्थेतच करण्यात




आली आहे. या महिलांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे संस्थेतच काम देऊन त्यांना मानधनही दिले जाते. संस्थेतील सर्वात लहान मुलगा दीड महिन्याचा आणि सर्वात मोठा मुलगा एकवीस वर्षांचा आहे.

आजवर संस्थेच्या वतीने एचआयव्ही संसर्गित तीन जोडप्यांची लग्ने लावून देण्यात आली आहेत. या जोडप्यांना झालेली बालके मात्र शासकीय रूग्णालयांमध्ये सर्वत्र मोफत उपलब्ध असलेल्या नेव्हेरेपिन औषध प्रणालीद्वारे एचआयव्ही संसर्गविरहित आहेत. ही सर्वात आनंदाची बाब असल्याचे मंगलताई आवर्जून सांगतात. ११० मुलांसाठी पहिली ते दहावीपर्यंतच्या मोफत शिक्षणाची, निवास-भोजनाची आणि त्यांच्या नियमित औषधोपचारांची सोय पालवीने केली आहे. दहा विद्यार्थी ७० टक्के गुणांसह दहावीपर्यंतचे शिक्षण घेऊन बाहेर पडले. पुढे अकरावीच्या प्रवेशासाठी अनेक अडचणी निर्माण झाल्या. मात्र द. ह. कवठेकर प्रशाला आणि कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या सहकार्याने मुलांच्या शिक्षणाची, त्यांच्या अभ्यासाची सोय झाली.

समाजातील अनेक व्यक्तींनी आपापल्या परीने या प्रकल्पाला बळ देण्याचे काम केले आहे. अकोला येथील एका दानशूर व्यक्तीने शाळेसाठी आठ खोल्यांची इमारत बांधून दिली. मुंबईच्या सई स्वाध्याय केंद्राच्या सतीश पै आणि अंजली पै यांनी सुमारे दोनशे व्यक्ती बसू शकतील इतका प्रशस्त हॉल बांधून दिला. पुण्यातील रवींद्र नाईक यांनी आपल्या आईच्या नावाने अरूणा कौशल्य विकास केंद्र उभारून दिले. या केंद्रात सुमारे अडीच लाख रूपयांच्या खेळ साहित्यांची सुसंगत मांडणी करण्यात आली आहे. खेळाच्या माध्यमातून मुलांचा मानसिक आणि शारीरिक विकास करण्याचा प्रयत्न केला जातो.

लातूर येथील भारती गोवंडे या महिन्यातून दहा दिवस पालवीत येऊन मुलांच्या अभ्यासाची जबाबदारी पार पाडत आहेत. शालेय अभ्यासक्रमाबरोबरच खेळ, नाट्य प्रशिक्षण, पुस्तक बांधणी, अवांतर वाचन, संगीत, कार्यानुभव अशा विविध गोष्टींमधून मुलांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला जात आहे. कौशल्य विकासावर आधारित स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून प्रशिक्षण देऊन टिकाऊ वस्तू, साड्यांची पायपुसणी, कॅरीबॅग, गोधड्या, विविध पर्सेस बनविल्या जातात. विविध ठिकाणी होणाऱ्या प्रदर्शनातून या उत्पादनांची विक्रीही केली जाते.

मुलांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी डॉ. शीतल शहा, डॉ. संगीता पाटील यांच्यासह अनेक डॉक्टर्स प्रयत्नशील आहेत. सकस आहाराचे काटेकोरपणे पालन केले जाते. यामध्ये गाईचे दूध, तूप, पंचगव्य, गोमूत्र, विविध कडधान्ये, डाळी, पालेभाज्या, फळे, खजूर यांचा आहारात समावेश असतो. दर दोन महिन्यानंतर सी.बी.सी., सहा महिन्यानंतर सी.डी.४ आणि व्हायरल लोड, एक्सरे तसेच संपूर्ण शारीरिक तपासण्या केल्या जातात.

प्रख्यात लेखक प्रवीण दवणे, डॉ. मंदा व डॉ. प्रकाश आमटे, अभिनेते जॅकी श्रॉफ,



आदेश बांदेकर, महेश मांजरेकर, पंढरीनाथ कांबळे, सुनिल गुर्जर, निर्मिती सावंत यांसह अनेक मान्यवरांनी भेट देऊन पालवीच्या कार्याचे कौतुक केले आहे.

सेवातीर्थ प्रकल्प : संस्थेच्या वतीने भविष्यात एचआयव्ही संसर्गित मुलांच्या आणि महिलांच्या स्वावलंबनासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण केंद्र साकारण्याचे नियोजन आहे. त्यासाठी शंभर एकर जागा घेऊन त्या ठिकाणी सेवातीर्थ प्रकल्प सुरू होणार आहे. सेवातीर्थच्या उभारणीसाठी सुमारे साडेचार कोटी रूपये खर्च अपेक्षित आहे. या पुनर्वसन केंद्रात एचआयव्ही संसर्गितांसाठी कायमस्वरूपी योग प्रशिक्षण केंद्र, वाचनालय, ध्यान केंद्र, समुपदेशन केंद्र, रोजगार मार्गदर्शन आणि उद्योग केंद्र, भव्य क्रीडांगण, आयुर्वेदिक उपचार आणि संशोधन केंद्र, नक्षत्रबन, आयुर्वेदिक औषधी व शोभेच्या रोपांची निर्मिती व विक्री केंद्र आदींचा नव्या आराखड्यात समावेश आहे. 'मातृवन' हा पाचशे बालकांसाठीचा निवासी प्रकल्पही निर्माणाधीन आहे.

प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार : पालवी प्रकल्पाला २०१२ सालचा प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार देण्यात आला. मॅगसेसे पुरस्कार विजेत्या मा. निलिमा मिश्रा यांच्या हस्ते मंगलताई शहा आणि डिंपल घाडगे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

संस्थेचे नाव : प्रभा-हिरा प्रतिष्ठान (पालवी प्रकल्प)
पत्ता : ४५८८/१, गाताडे प्लॉट, जुना कराड नाका, ता. पंढरपूर, जि. सोलापूर. ४१३३०४
संपर्क : डिंपल घाडगे (९८६००६९९४९, ९५४५९७८६८६)
नोंदणी वर्ष : २१ मार्च २००१
नोंदणी क्रमांक : ई - ७७२
बँकेचे नाव व खाते क्रमांक : आयडीबीआय बँक (५४०१००१०००४८४३)
आयएफएससी कोड : IBKL0000540
वेबसाईट : www.palawi.org
ई मेल : dimple@palawi.org / info@palavi.org



# भगिनी निवेदिता ग्रामीण विज्ञान निकेतन

निलिमा मिश्रा यांना २०११ सालचा रॅमन मेगॅसेसे पुरस्कार जाहीर झाला आणि त्यानिमित्ताने निलिमा मिश्रा कोण? असा प्रश्न सामान्य माणसाला पडायला लागला. आपल्या आसपासच खोलवर रूजलेल्या सामाजिक कामाची आपणाला जाणीव नसते कदाचित माहिती पण नसते. तसेच काहीसे निलिमा मिश्रा यांच्या बाबतीत झाले. मेगॅसेसे पुरस्कार जाहीर झाला आणि त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराने महाराष्ट्राचीच नव्हे तर संपूर्ण देशाची मान गौरवाने उंचावली.

निलिमा मिश्रा यांचं घराणं मूळचं उत्तर भारतातलं. पण गेल्या साताठ पिढ्यांपासूनचं वास्तव्य महाराष्ट्रातलंच. 'भगिनी निवेदिता ग्रामीण विज्ञान निकेतन' या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण विकासाचा ध्यास घेतला. धुळे, जळगांव, नंदुरबार, नाशिक या परिसरात त्यांच्या कार्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. लहानथोर सर्वांसाठीच त्या 'दिदी' बनल्या आणि लोकांच्या सहभागातूनच लोकांच्या समस्यांना उत्तर शोधत विकासाचं एक नवं मॉडेल त्यांनी निर्माण केलं.

महिला सक्षमीकरण, स्वयंपूर्ण गावाची संकल्पना घेऊन त्यांनी मोठी चळवळ उभी केली. गावाने स्वतःच्या समस्या स्वतः सोडवाव्यात. बाहेरचा कुणी येऊन आपल्या समस्या सोडवू शकत नाही. कारण आपल्याला माहिती असतं की आपल्याला काय हवंय! याच साध्यासोप्या सूत्रावर त्यानी ग्रामीण विकासाची मोठी चळवळ उभी केली.

ग्रामीण भागात शेती हाच जगण्याचा एकमेव आधार असतो. शेतकऱ्यांना कसण्यासाठी, लागवडीसाठी बचतगटांच्या माध्यमातुन अर्थसहाय्य करणे, बाजारपेठ मिळवून देण्यासाठी, मालाच्या वाहतुकीसाठी सहकार्य केले जाते. बचतगटांच्या माध्यमातून दिलेल्या कर्जाला अत्यंत माफक व्याज आणि रास्त मुदत दिली जाते. महिलांना संघटित करून त्यांना बचतीचे महत्व पटवणे, बचतीसाठी प्रवृत्त करणे, बचतीचा विनियोग कुटुंबाच्या गरजा आणि दीर्घकालीन फायद्यासाठी केला जातो.

संत तुकडोजी महाराजांच्या 'ग्राम गीता'वरून प्रेरणा घेऊनग ग्रामविकासाचे आदर्श मॉडेल बनविण्यात आले आहे. लोकांचाच लोकांसाठीच एक ग्रामनिधी तयार केला जातो. ज्याला पैशाची आवश्यकता आहे त्यांनी या निधीमधून कर्जाऊ पैसे घ्यायचे व ठराविक वेळेत परत करायचे. ज्या लोकांकडून हा निधी उभा केला जातो त्यांनीच या निधीची जबाबदारी स्वीकारलेली असते.एका अर्थाने हे स्वातंत्र्य आणि जबाबदारी दोन्ही एकाचवेळी त्यांच्याकडे येते. कर्ज घेणारा हा ग्रामसभेचा अथवा कोणत्या ना कोणत्या बचत गटाचा कार्यशील सभासद असला पाहिजे, घरातील कोणताही सदस्य व्यसनी असता कामा नये, कुटुंबाने कधीही कुऱ्हाड बंदीचे उल्लंघन केले नसले पाहिजे,



कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेली असली पाहिजे, कुटुंबातील कुणाही सदस्याने उघड्यावर शौच करता कामा नये. या सगळ्या अटी पूर्ण करणाऱ्या कुटुंबाला 'आदर्श कुटुंब' म्हणून गौरविले जाते. तेच कुटुंब कर्जाला पात्र समजले जाते.

ग्रामस्वच्छतेचाही संकल्प या आदर्श गाव योजनेत आहे. अनेक देणगीदारांच्या माध्यमातून मिळालेल्या निधीतून विशेष शौचालयाचे बांधकाम केले. त्यातुन 'लोटा बंदी' लागू करण्यात आली. शोष खड्डे निर्माण करण्यात आले. असे शोष खड्डे किंवा स्वतंत्र संडास बांधण्यासाठी रू. दहा हजार कर्जाऊ दिले जातात. दोन वर्षात त्याची परतफेड करायची. या सगळ्या प्रयत्नातून बहादूरपूर हे गाव 'हागणदारी मुक्त' गांव झाले आहे. स्वच्छतेच्या बरोबरीने जलसंधारणाचे अनेक प्रयोग या संस्थेच्या माध्यमातून करण्यात आले.

गोधडी बनविण्याचा व्यवसाय :

महिलांच्या पारंपारिक कौशल्याला व्यवसायाचे स्वरूप देत गोधडी बनवण्याचा व्यवसाय मोठा केला. महिलांचं हस्तकौशल्य आणि गटाच्या माध्यमातून मार्केटिंग या सूत्रानुसार गोधडी विक्री करायला सुरूवात केली. अत्यंत आकर्षक डिझाईन, आकार आणि रंगसंगती याचं योग्य ते प्रशिक्षण महिलांना दिलं गेलं. कामाचे तास, उत्पादनाची अपेक्षा, कामातला सफाईदारपणा या सगळ्या गोष्टी आत्मसात करण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण दिले गेले.

महिला लघु ग्राम उद्योग :

रंग दे, बंगळुरू या संस्थेने केलेल्या अर्थसहाय्याच्या बळावर बहादूरपूर, महाळपूर, शिरसोदे, पाचोरा, जळगांव, जिराळी, भुसावळ, मनमाड, अमळनेर, पुणे आदी ठिकाणी महिलांनी लघु ग्राम उद्योग सुरू केले. या माध्यमातून दुकानांमध्ये लागणारे रेडिमेड गारमेंट्स होलसेल दराने उपलब्ध करून देण्यात येतात. रेडिमेड गारमेंट्सची निर्मिती गावातच केल्यास होलसेल दरापेक्षाही ३० ते ३५ टक्के स्वस्त दरात रेडिमेड गारमेंट्स उपलब्ध होतील हे ओळखून संस्थेने कुर्ता शिलाई युनिट सुरू केले आहे.

तसेच आंतरराष्ट्रीय रोटरी क्लबच्या सहकार्याने चाळीसगांव येथील रोटरी क्लबद्वारे बहादूरपूर-शिरसोदे गावासाठी ३०० वैयक्तिक शौचालये व आर.ओ. वॉटर फिल्टर प्लांटसाठी ५६ लाख रूपयांचा निधी मंजूर घेतला. नंदूरबार जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात सुरू असलेल्या सोलर प्रोजेक्ट अंतर्गत एकूण ९०० आदिवासी घरांमध्ये सोलर होम लाईट सिस्टीम संस्थेच्या पुढाकारातून बसविण्यात आली.

ग्रामरचना प्रकल्प :

ग्रामरचना हा संस्थेचा ड्रीम प्रोजेक्ट आहे. या प्रकल्पात गावाचा सर्वांगीण विकास व्हावा अशी रचना आहे. या रचनेत गावाचे गल्लींमध्ये विभागणी करून प्रत्येक गल्लीतील कुटुंब व प्रत्येक कुटुंबातील सदस्यांच्या प्रश्नांवर कार्य होईल अशी रचना आहे. प्रत्येक गल्लीत दर १५ दिवसांनी पाक्षिक सभा घेण्यात येते. संस्थेच्या वतीने या



सभा गल्ली सखी, उद्योग सखी, कृषी सखी, आरोग्य सखी घेत असतात. तसेच बालक व युवक-युवती यांच्या स्वतंत्र सभा घेण्याचेही यात नियोजन आहे. ग्रामस्थांच्या गरजा भागविण्यासाठी काही ठोस तरतूदी यात आहेत. त्यातील महत्वाची म्हणजे अुंसहाय्य. बचतगट, शौचालये, रूफ वॉटर हार्वेस्टिंग, वॉटर मॅनेजमेंट, वृक्ष लागवड, स्वच्छता, योग-प्राणायाम, श्रमदान, सामाजिक कार्यात सहभाग अशा निकषांवर या तरतूदींचा लाभ दिला जातो. भविष्यात ६०० गावांमध्ये हा प्रकल्प राबविण्याचा मानस आहे.

स्व. सुभाष रावजी शहा स्मृति पुरस्कार :

मा. निलिमा मिश्रा यांच्या 'भगिनी निवेदिता ग्रामीन विज्ञान निकेतन' या संस्थेच्या माध्यमातून केलेल्या ग्रामविकासाच्या अभिनव उपक्रमाची दखल घेऊन प्रिसिजन फाऊंडेशनकडून दिला जाणारा सन २०१३ सालचा 'स्व. सुभाष रावजी शहा स्मृति पुरस्कार' देण्यात आला.

संस्थेचे नाव : भगिनी निवेदिता ग्रामीण विज्ञान निकेतन
पत्ता : बहादूरपूर, ता. परिला, जि. जळगांव. ४२५११३
संपर्क : विनोद सोनार (९७६४२५४०२२)
नोंदणी वर्ष : ३० ऑक्टोबर १९३२
बँक खाते व क्रमांक : स्टेट बँक ऑफ इंडिया (११६४२५९०१४५)
आयएफएससी कोड : SBIN0004540
वेबसाईट : www.bngvn.org
ई मेल : Vinod@bngvn.org



# पाखर संकुल

पाखर संकुलची निर्मिती ही मानवतेच्या पूजेतून समाज ऋण फेडावे म्हणून झाली. श्रीशुभराय महाराजांची अजोड अध्यात्मिक परंपरा, त्यास उपासना, कला आणि साहित्याची जोड होती. श्री शुभरायांचे शिष्य रावजी बुवांनी ही परंपरा जोपासत पुढील पिढ्यांकडे सुपूर्द केली. त्यांच्या सहाव्या पिढीतील परंपरेची दिंडी सांभाळली ती शुभांगी बुवा यांनी.

नको असताना जन्मलेले बाळ आपण सांभाळायचे यातून पाखर संकुलची निर्मिती झाली. एका कामातून दुसरे काम यामुळे कार्याच्या कक्षा रूंदावत गेल्या. यासाठीची प्रेरणा शुभांगी बुवा यांना श्रीशुभराय महाराजांच्या भक्तीतून मिळाली. भगवान श्रीकृष्ण, पांडुरंग, श्री शुभराय आणि श्री शंकरमहाराज यांच्या प्रेरणेतून साकारलेला हा मठ सामाजिक उत्थानाचे केंद्र बनला. समाजानेही या प्रेरक कार्याची महती ओळखली आणि बुवा यांना वेळोवेळी मदत केली.

जन्मलेल्या बाळापासून ६ वर्षे वयाच्या बाळांचे पाखर संकुल हे घर आहे. या बाळांची बाळघुटी, सकस चौरस आहार आणि त्यांची आरोग्यपूर्ण काळजी घेतली जाते. त्याच्या मानसिक आणि भावनिक वाढीसाठी प्रयत्न केले जातात. त्याने लवकर चालावे, बोलावे, त्याची बुद्धी कुशाग्र व्हावी यासाठी सर्व प्रकारचे संस्कार त्याच्यावर केले जातात. त्याच्याशी बोलायला, खेळायला आणि प्रेम लावायला खूप माणसं सेवावृत्तीनं येतात. येथील बाळांचे कायम स्वरूपी पुनर्वसन व्हावे, त्यांना आई, बाबा, कुटुंब, घर कायदेशीररित्या हक्काने मिळावे, यासाठी देशांतर्गत आणि आंतरदेशीय दत्तक विधानाची मान्यता संस्थेस मिळाली आहे. बाळ भविष्यात समाजात सृजनशील नागरिक होईल.

ज्या मुलांना शिक्षणाची ओढ आहे पण शिकता येत नाही, तसेच ज्यांना आई वडील नाहीत, आई मोल मजुरी करून मुलांना वाढवते, त्यांच्यासाठी बालसंगोपन योजना राबविली जाते. अशा मुलांना या योजनेद्वारे शैक्षणिक, आर्थिक सहकार्य केले जाते. बालसंगोपन योजना ही शासनातर्फे राबविली जाते. तशाच पद्धतीने विद्यादायिनी योजना ही संस्थेतर्फे चालविली जाते. या योजनेअंतर्गत, समाजातील दानशूर व्यक्ती दारिद्रय रेषेखालील विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सहकार्य करतात.

बालसंगोपन आणि विद्यादायिनी योजनेतील विद्यार्थ्यांसाठी शुभसंस्कार वर्ग दर शनिवारी आणि रविवारी संस्थेत चालविले जातात. मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच त्यांचा व्यक्तिगत विकास व्हावा यासाठी हा वर्ग आहे. यामध्ये राष्ट्रीय सण, उत्सव, परंपरांच्या वैविध्यपूर्ण सादरीकरणात मुलं सहभागी होतात. त्यांच्यासाठी



स्नेहसंमेलनही आयोजित केले जाते.

पौगंडावस्थेतील मुलामुलींचे प्रश्न खूप वेगळे असतात. या वयात शरीराबरोबरच मानसिकतेमध्ये बदल होत असतात. त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणे, मानसिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी संस्था किशोरकिशोरी प्रकल्प राबविते. समाजातील तज्ज्ञ मंडळी मुलांशी दर शनिवार, रविवार संवाद साधतात. मुलांना फुलांच्या माळा तयार करण्यापासून पतंग तयार करण्यापर्यंतचे हस्तव्यवसाय शिकविले जातात. सुटीच्या कालावधीत तसेच विविध उत्सवांवेळी स्वतःच्या छंदांमधून आर्थिक स्वावलंबन शिकविण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जातो. मुलांच्या मनात कुटुंबाला आधार देण्याची जाणीव यामुळे निर्माण होते. नृत्य, नाट्य, संगीताचेही वर्ग चालविले जातात.

उन्मेष प्रकल्पाअंतर्गत श्री शंकर महाराज पुण्यतिथीनिमित्त बालसंगोपन आणि विद्यादायिनी योजनेच्या लाभार्थ्यांसाठी एप्रिल-मे दरम्यान १५ दिवसांचे उन्हाळी शिबीर आयोजित केले जाते. दरवर्षी नवीन एखादी कल्पना मुलांचे कौशल्य विकसित केले जाते. त्यांचे व्यावहारिक ज्ञान वाढविण्यावर भर दिला जातो. उत्तम गुण मिळवूनही ज्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेणे परिस्थितीमुळे शक्य होत नाही त्यांच्यासाठी विद्याकोश ही योजना संस्था राबवित आहे.

बदलत्या समाजरचनेत गुणवंत, शीलवंत पिढी तयार होण्यासाठी गरोदर स्त्रियांवर कौटुंबिक, भावनिक, सामाजिक, अध्यात्मिक, आरोग्यदायी संस्कार होणे आवश्यक बाब झाली आहे. गरोदरपणात महिलेचे मन प्रसन्न राखणे, तिच्यासाठी आणि जन्माला येणाऱ्या बाळावर छान संस्कार करण्याच्या उद्देशाने पाडवा ते रामजन्म या कालावधीत गर्भसंस्कार शिबीर आयोजित करण्यात येते. त्यानिमित्त तज्ज्ञमंडळींकडून वेगवेगळे विषय गर्भवतींपुढे मांडले जातात. तसेच त्यांच्या डोहाळजेवणाचा सुंदर व हृद्य कार्यक्रम केला जातो.

संस्थेच्या वतीने कुटुंब सल्ला केंद्र चालविले जाते. एखाद्या कुटुंबात उद्भवणारे प्रश्न हे तडजोडीने, समुपदेशनाने मिटविण्याचे काम केंद्रात केले जाते. कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ अंतर्गत महिलांना शैक्षणिक, कायदेविषयक, वैद्यकीय सेवा पुरविणारी संस्था अशी मान्यता मिळाली आहे. अन्यायग्रस्त महिलेला मानसिकदृष्ट्या आधार दिला जातो. तालुक्याच्या ठिकाणी पोलिस स्टेशनच्या आवारात महिलांच्या मदतीसाठी शासनातर्फे समुपदेशन केंद्र चालविले जाते. असेच समुपदेशन केंद्र संस्थेला बार्शी तालुका पोलिस स्टेशनच्या आवारात देण्यात आले आहे.

पाखर संकुलच्या माध्यमातून अनाथ बाळांवर मायेचा पदर पांघरणाऱ्या श्रीमती शुभांगी जयकृष्ण बुवा यांनी समाजशास्त्र विद्याशाखेची पदवी घेतली. देव, देश आणि समाजासाठी बुवा यांनी वारकरी होऊन भक्तिमार्ग पत्करला. पुण्यातील नोकरी सोडून त्या सोलापूरात आल्या. समाजासाठी योगदान देणे हे आपले कर्तव्य आहे असे मानून त्या आनंदाने सक्रिय झाल्या. मातापित्याला नकोसे झालेले बाळ सांभाळण्याचा वसा



त्यांनी घेतला आणि पाखर संकुलची स्थापना झाली. अनाथ बाळं त्यांनी ह्दयाशी धरली. शुभराय मठात येणाऱ्या प्रत्येक वंचित आणि उपेक्षितांसाठी त्या झटल्या. समाजातील अबालवृद्धांसाठी त्यांनी कार्य उभे केले. मठाचे उत्सव, परंपरा त्यांनी अव्याहतपणे मोठ्या जोमाने पुढे चालू ठेवल्या. भगवंत चरणी लीन राहून समाजातील वास्तवतेचे भान ठेवून देवावर प्रेम करावे तशीच त्यांनी समाजाची पूजा केली. सोलापूरातील नामवंत चौदा संस्थांवर त्या कार्यरत आहेत. त्यांच्या कार्याची निष्ठा वाखाणण्याजोगी आहे. दत्तक विधानाद्वारे अनाथ बाळांना हक्काचे कायदेशीर आईबाबा ते मिळवून देतात. पाखर संकुलातील अनेक बाळं परदेशातही आनंदानं वाढत आहेत.

प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार :

समाजसेवेच्या ह्दयस्पर्शी कार्यामुळे समाजानेही शुभांगी बुवा यांना अनेक सन्मानाचे पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला आहे. प्रिसिजन फाऊंडेशनतर्फे २०१३ साली मेळघाटात कार्य करणाऱ्या डॉ. रविंद्र आणि डॉ. स्मिता कोल्हे यांच्या हस्ते त्यांना प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार देण्यात आला.

संस्थेचे नाव : पाखर संकुल
पत्ता : १५७ दक्षिण कसबा, श्रीशुभराय महाराज मठ, शुभराय टॉवर्स, दत्त चौक, सोलापूर. ४१३ ००७
संपर्क : शुभांगी बुवा (९८५०९७८७०१)
नोंदणी क्रमांक : एफ ५३४६
बँक खाते व क्रमांक : बँक ऑफ महाराष्ट्र (२००६३३०२१८१)
आयएफएससी कोड : MAHB0000017
ई मेल : pakhar_sankul@rediffmail.com



# डॉ. रविंद्र आणि डॉ. स्मिता कोल्हे

सन १९८५ साली जेंव्हा देवराव कोल्हे भारतीय रेल्वेसाठी काम करत होते तेंव्हा त्यांचे पुत्र रविंद्र हे मेडिकल सायन्सच्या शेवटच्या वर्षाला होते. त्यांच्या घराण्यात अनेक पिढ्यांमधला पहिला डॉक्टर होण्याची सगळेच आतुरतेने वाट पाहात होते. शेगावातील त्यांच्या घरी तरी अत्यंत उत्साहाचे वातावरण होते. एक यशस्वी व्यक्ती म्हणून त्यांच्या आगमनाकडे सगळ्यांचेच डोळे लागलेले होते. पण त्याचवेळी डॉ. रविंद्र यांच्या मनात वेगळेच काही तरी चाललेले होते. केवळ पैसा, यश कमवण्यासाठीच आपल्या डॉक्टरकीचा उपयोग होऊ नये तर समाजातल्या उपेक्षित लोकांच्या आरोग्यासाठी आपल्या शिक्षणाचा उपयोग व्हावा असे त्यांना वाटत होते.

महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा यांच्या विचारांचा जबरदस्त पगडा त्यांच्या मनावर होता. त्यामुळेच भरभरून पैसा देणारी मेडिकल प्रॅक्टीस न करता खरोखर गरजू लोकांच्या उपयोगी येईल असे काहीतरी करावे हेच त्यांच्या मनात होते. पण नेमका मार्ग सापडत नव्हता. अशातच डेव्हीड वार्नरचं 'व्हेअर देअर इज नो डॉक्टर' हे पुस्तक त्यांच्या वाचनात आलं. त्या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर चारपाच लोक एका रूग्णाला पालखीत बसवल्यासारखे घेऊन जात होते. त्याखाली लिहिले होते 'हॉस्पिटल ३० मैल लांब!' हे वाचताच डॉ. रविंद्र कोल्हेंना जणू एका दिशेचा शोध लागला. त्याच ठिकाणी कामाची सुरूवात केली पाहिजे, जिथे कोणत्याही प्रकारच्या वैद्यकीय सेवा, सुविधा नाहीत. या विचारातूनच त्यांनी 'बैरागड' या गावाची निवड केली. हे गाव अमरावती जिल्हृयात मेळघाटातलं अतिशय दुर्लक्षित, दुर्गम असं गांव आहे. अमरावतीच्या पुढे हरिसालपर्यंत जाता येते. पण त्यापुढे ४० मैल केवळ पायीच जावे लागते.

डॉ. कोल्हे यांचे प्रोफेसर जाजू म्हणतात की, अशा ठिकाणी म्हणजेच कोणत्याही सोयी नसलेल्या ठिकाणी काम करायचे असेल तर सोनोग्राफीशिवाय, रक्त देण्याच्या कोणत्याही सोयीशिवाय गरोदर बाईची डिलिव्हरी, एक्स रे शिवाय न्युमोनियाचे निदान करणे आणि डायरियाचा इलाज करणे या तीन गोष्टी जमणे अत्यंत आवश्यक आहे. या तिन्ही गोष्टी शिकण्यासाठी डॉ. रविंद्र कोल्हे मुंबईला सहा महिने राहिले आणि नंतर बैरागडला गेले.

१९८७ साली एम डी करण्यासाठी ते मेळघाटातून बाहेर पडले. मेळघाटातल्या कुपोषणावर त्यांनी सादर केलेल्या प्रबंधामुळे संपूर्ण जगाचे लक्ष मेळघाटाकडे ओढले गेले. बीबीसीनेही या कुपोषणावर एक कार्यक्रम प्रसारित केला. त्यामुळे तिथल्या अनेक समस्यांना वाचा फुटली. पण उत्तर शोधणार कोण... नियतीनं डॉ. रविंद्र कोल्हे



यांच्या रूपानं हे उत्तर देऊन टाकलं !

तिथे काम करताना त्यांना एका जोडीदाराची गरज होती. पण आपल्या तत्वाला अनुसरणारी, बैरागडसारख्या आडवळणी गावात कुठल्याही सुविधा नसताना राहून साथ देणारा जोडीदार हवा होता. बैरागड येथे जाण्यासाठी ४० मैल ती चालू शकली पाहिजे, केवळ पाच रूपयात लग्न केले पाहिजे, दरमहा केवळ ४०० रूपयात संसार केला पाहिजे आणि लोकांच्या कल्याणासाठी दुसऱ्यांकडे हात पसरण्याचीही तयारी असली पाहिजे, अशा चार अटी मान्य असणाऱ्या मुलीशीच लग्न करायचा निर्णय त्यांनी घेतला. शंभरावर मुलींना नकार दिल्यानंतर त्यांना डॉ. स्मिता भेटल्या. डॉ. स्मिता यांच्या रूपाने आणखी एक डॉक्टर बैरागडला मिळाला.

कुपोषण, न्युमोनिया, सर्पदंश, मलेरिया अशा अनेक कारणांनी मृत्यूचे प्रमाण वाढलेले होते. पण त्याच्या मुळाशी जाऊन कुणीच काम करत नव्हते. न्युमोनिया का होतो, कुपोषण का होते तर याचे कारण आहे गरीबी! ती दूर झाली तर सगळ्या समस्या दूर होतील. अंगावर पुरेसे कपडे नाहीत. गरिबीमुळेच पोटाला पुरेसे अन्न मिळत नाही. या मूळ समस्येला उत्तर शोधण्यासाठी डॉ. रविंद्र आणि डॉ. स्मिता कोल्हे यांनी अथक प्रयत्न केले. या भागातल्या लोकांना असे वाटायचे की, आपल्या डॉक्टरकडे सगळ्या प्रश्नांची उत्तरे असतात. म्हणून ते पशुंचेही आजार घेऊन यायचे. शेवटी डॉक्टरांनी आपल्या एका पशुवैद्यक मित्राकडून थोडे ज्ञान घेतले आणि उपचार करायला सुरूवात केली. त्यानंतर शेती आणि पशुपालन या विषयावर लक्ष केंद्रीत केले. शेतीचे अनेक प्रयोग त्यांनी आपल्या शेतीत पत्नीच्या मदतीने केले. त्यासाठी पंजाबराव कृषि विद्यापीठातून शेतीविषयीचे ज्ञानही मिळवले. त्यांनी पर्यावरणाचाही अभ्यास केला, निसर्गचक्राचा अभ्यास केला. त्यावरून संभाव्य दुष्काळाची कल्पना देऊन त्यासाठी लोकांना तयार राहायला ते सांगतात.

कोल्हे दाम्पत्याच्या अगणित कष्टाचे फळ म्हणून आज मेळघाटात चांगले रस्ते, वीज, १२ प्राथमिक उपचार केंद्रे आहेत. त्यांचे दोन्ही पुत्र रोहित व राम हेही याच कार्यात लक्ष घालतात. त्यांच्या आजवरच्या कार्याने काही मूलभूत समस्यांवर उपाय शोधण्यात तरी यश आले. आता त्यांना हवी आहे ती समाजाची आणि प्रशासनाची साथ!

कोल्हे दांपत्याकडून शेती आणि पशूपालनाविषयी मार्गदर्शन केले जाते. त्यांनी वृक्षसंवर्धनाचेही कार्य मोठ्या प्रमाणावर केले आहे. त्यामुळे मेळघाटातील शेतकरी आत्महत्येच्या दुष्टचक्रातून मुक्त झाला आहे. इतकंच नव्हे तर तरूण पिढीला श्रमदानाचं महत्व कळावं यासाठी २५ पेक्षाही अधिक निवासी मेळावे त्यांच्या पुढाकारातून झाले आहेत. या शिबीरातून तरूणाईला मेळघाटासारख्या दुर्गम भागातील समस्या, आदिवासी समाजाचं जीवनमान, शेती, वन्यजीवांचा सहवास असे अत्यंत महत्वाचे अनुभव घेता येत आहेत. एक प्रकारे तरूण पिढीतलं माणूसपण



टिकवण्याचाच हा प्रयत्न कोल्हे दांपत्याकडून होतोय.
आजही एका झोपडीवजा घरात साप, विंचवाच्या सानिध्यात जगणाऱ्या या कुटुंबाने सेवेसाठी येऊ पाहणाऱ्या प्रत्येकाचे स्वागतच केले. बैरागडला आजही संपर्काचे साधन नाही. वर्षातले सहा महिने इतर जगाशी संपर्क तुटतो. या सगळ्या परिस्थितीतही नेटाने, निष्ठेने कार्य करणाऱ्या डॉ. रविंद्र आणि डॉ. स्मिता कोल्हे यांना सलामच केला पाहिजे.

स्व. सुभाष रावजी शहा स्मृति पुरस्कार :
प्रिसिजन गप्पांच्या अंतर्गत दिला जाणारा स्व. सुभाष रावजी शहा स्मृति पुरस्कार डॉ. रविंद्र आणि डॉ. स्मिता कोल्हे यांना २०१३ साली देण्यात आला. एक लाख रूपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते.
संपर्क : डॉ. रविंद्र कोल्हे (९४०४१०५१८०, ९३७१७१७५२२)



# भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान : यमगरवाडी सेवा प्रकल्प

एकेकाळी भारतीय गावगाड्याशी आणि वैभवसंपन्न समाजाशी जोडले गेलेले, भव्य मंदिरे, अजिंठा-वेरूळसारखी शिल्पे, शेती, गाईगुरांशी निगडीत असलेले विज्ञान, वैद्यकशास्त्र, शस्त्रास्त्र निर्मितीमध्ये पारंगत, भविष्य जाणणारे-सांगणारा, आपल्या विविध कलांनी, कौशल्यांनी लोकांचं मनोरंजन करत फिरणारा हा भटका समाज. या समाजाला हजारो वर्षांची परंपरा आहे. हे समाजबांधव कधी मुस्लिम आक्रमकांशी तर कधी इंग्रजांशी कडवी झुंज देत होते. याच भटक्या समाजातील उमाजी नाईक हे आद्य क्रांतीकारक होते तर बहिर्जी नाईकांवर छत्रपतींच्या स्वराज्यात गुप्तहेर खात्याची प्रमुख जबाबदारी होती. परंतु इंग्रजांनी अनेक जातींना गुन्हेगार ठरवून त्यांना ठिकठिकाणी सेटलमेंट उभ्या करून कुंपणात डांबून ठेवले. मग समाजानेही त्यांच्याकडे गुन्हेगार म्हणूनच पाहायला सुरूबात केली. नंतरच्या काळात या समाजाला उत्पन्नाचे साधनच उरले नाही. हा समाज देशाधडीला लागला. सुस्थिर असलेल्या समाजाने मग त्यांची अवहेलना आणि हेटाळणी सुरू केली. आजच्या २१ व्या शतकातही या समाजाची ससेहोलपट संपलेली नाही.

सन १९९१ ला भटके विमुक्त विकास परिषदेची पुणे येथे स्थापना झाली. १९९३ मध्ये पारधी समाजाचा मेळावा सोलापूरच्या हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर पार पडला. त्यानंतर १९९३ सालीच यमगरवाडी जि. उस्मानाबाद येथे एकलव्य वसतिगृहाची सुरूवात झाली. टिटवाळ्याचे श्री रमेश चाटुफळे यांनी १८ एकर जमीन भटके विमुक्त विकास परिषदेला दान दिली आणि यमगरवाडीच्या माळावर पारधी समाजातील २५ मुलांना घेऊन पहिली शाळा सुरू झाली. २५ मुले आणि मुली, तीन झोपड्या अशा अवस्थेत भटकेश्वराची आराधना करत प्रकल्पाचे काम चालू झाले. सुरूवातीच्या काळात शिक्षणाच्या ओढीपेक्षा आपली मुलं पोलिसांच्या कचाट्यातून बाहेर काढून सुरक्षित ठेवण्यासाठी पारधी समाज यमगरवाडीला जाऊ लागला. पुढच्या २०-२५ वर्षात सुरक्षिततेच्या बरोबरीने शिक्षणाचेही महत्व पटायला लागले. त्यातून मुलांची संख्या वाढली. १९९६ साली एकलव्य प्राथमिक आश्रमशाळेला शासनाची मान्यता मिळाली. या शाळेत आज ४५० हून अधिक मुले शिक्षण घेतायत. केवळ १६० मुलांसाठी शासनाचे अनुदान मिळते. उर्वरित मुलांचा खर्च समाजाकडून मिळालेल्या दानातून भागवला जातो.

भटके विमुक्त समाजामध्ये जिथे मुलांच्या शिक्षणाबद्दल आस्था नाही तिथे मुलींच्या शिक्षणाची काळजी कोण करणार? मुलींना शिकवणे हे पाप समजले जाते. महादेवी भोसले नावाची पहिली मुलगी या प्रकल्पावर दाखल झाली आणि तिच्यासाठी



शबरीमाता कन्या वसतिगृह सुरू झाले. आता या वसतिगृहात २०० हून अधिक मुली शिक्षण घेतायत. त्यांच्यासाठी एक सुसज्ज वसतिगृहाची इमारत उभी केली गेली.

भटके विमुक्त समाजाचे जीवन आणि अंगभूत गुणांना लक्षात घेऊन त्यांचे भावविश्व खुलवण्याचा प्रयत्न येथे केला जातो. त्यांना असलेले निसर्गज्ञान, अंगची लवचिकता, काटकपणा, शारिरीक क्षमता लक्षात घेऊन तसे अभ्यासक्रम राबवले जातात. संगीत, गायन, अभिनय, लोककला, कारागिरी अशा अनेक गुणांची देण त्यांना निसर्गतःच मिळते. त्यांचा विकास करण्यासाठी सांस्कृतिक दालन खुले केले जाते. ही मुलं अतिशय काटक आणि चपळ असल्याने त्यांचे क्रीडानैपुण्यही विकसित केले जाते. मल्लखांब, मैदानी खेळ, नेमबाजी, कब्बडी अशा खेळांमध्ये या मुलांनी चांगली बाजी मारली आहे.

याशिवाय, वसतिगृहातील मुलामुलींसाठी आरोग्य केंद्र चालवले जाते. मोफत औषधोपचार केला जातो. तसेच तज्ज्ञ डॉक्टरांची आरोग्यविषयक व्याख्याने आयोजित केली जातात. दरवर्षी विविध ठिकाणी भटके विमुक्त विकास परिषदेच्या अंतर्गत भटक्यांचा मेळावा आयोजित केला जातो. त्यातून समाजाच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्याचा प्रयत्न केला जातो. शिक्षणाच्या बरोबरीने स्वावलंबन, सुरक्षा आणि सन्मान या चतुःसूत्रीवर या संस्थेचे कार्य चालते. मा. दादा इदाते यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय समितीची स्थापना होऊन भटके विमुक्त समाजासाठी स्वतंत्र संचालनालय स्थापन करण्यात आले. मरीआईवाले मरगम्मा ही जात शासनमान्य झाली. राष्ट्रीय पातळीवर भटके विमुक्त समाजासाठी रेणके आयोगाची स्थापना झाली. सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी परिषदेच्या मागणीचा विचार करून ३२०० भटक्या विमुक्तांना वेगवेगळे नऊ शासकीय दाखले देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले. ही सगळी उपलब्धी ही या भटके विमुक्त विकास परिषदेच्या कार्यामुळे साध्य झाली.

भविष्यातील योजना :

भटके विमुक्त विकास परिषदेच्या अंतर्गत यमगरवाडी प्रकल्पाच्या विकासासाठी विविध विकास योजना आखल्या आहेत. त्यात प्रकल्पाच्या संपूर्ण परिसराचे जल पुनर्भरण आणि जलसंवर्धनाची योजना राबविली जाणार आहे. सुसज्ज ग्रंथालय व वाचनालय उभे केले जाणार आहे. भटके विमुक्त जमातीतील मुलामुलींचे क्रीडा नैपुण्य लक्षात घेऊन आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडांगण आणि जलतरण तलाव सुरू करण्याची योजना आहे. विज्ञान केंद्र आणि खगोलशास्त्र प्रयोगशाळा उभी करण्याचीही या संस्थेची योजना आहे. शेती संशोधन, शेती तंत्राचा प्रसार या बरोबरीने अपारंपारिक ऊर्जा संशोधन व उपयोगिता केंद्र सुरू केले जाणार आहे. भटके विमुक्त कलाग्राम सुरू करून या समाजाच्या पारंपारिक कलांना ऊर्जितावस्था आणण्याचा प्रयत्न केला जाईल.



भटके विमुक्त विकास परिषदेचे कामकाज डॉ. सुवर्णा रावळ (अध्यक्ष), श्री. चंद्रकांत गडेकर (उपाध्यक्ष), नरसिंग बाबूराव झरे (कार्यवाह), उमाकांत मितकर, लक्ष्मण सुपनार, भारतबाई देवकर, विजय वाघमारे, नारायण बाबर, दुर्गादास गुडे आदींमार्फत चालविले जाते.

प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार :
भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानचे कार्य लक्षात घेऊन प्रिसिजन फाऊंडेशनने २०१४ सालचा प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार त्यांना प्रदान केला. चित्रपट दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

संस्थेचे नाव : भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान
पत्ता : एकलव्य विद्या संकुल मु. यमगरवाडी, पो. नांदुरी, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद. ४१३६०१
सोलापूर कार्यालय पत्ता : ७९४, दक्षिण कसबा, शिवस्मारक जवळ, शिंदे चौक, नवी पेठ, सोलापूर. ४१३००१
संपर्क : रावसाहेब कुलकर्णी (९४२०३०१९९२), विजय वाघमारे (९८२२३२९५६९), मदन कुलकर्णी (९४२२४६६४६९)
नोंदणी वर्ष : १८ सप्टेंबर १९९२
नोंदणी क्रमांक : ३४५७/९२
बँक खाते व क्रमांक : स्टेट बँक ऑफ इंडिया (३११४४३६९३२६)
आयएफएससी कोड : SBIN0003674
वेबसाईट : www.bvvp.org
ई मेल : bvvp93@gmail.com



# संस्कार संजीवनी फाऊंडेशन

भटके विमुक्त विकास परिषदेच्या यमगरवाडी प्रकल्पामध्येच लहानाचा मोठा झालेला, तिथल्याच संस्काराने आणि कार्यकौशल्याने तयार झालेला कार्यकर्ता म्हणजे परमेश्वर काळे. परमेश्वरने आपली पत्नी सौ अरूणा काळे हिच्या सहकार्याने मुळेगाव ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथे 'आदिवासी पारधी विद्यार्थी आश्रम' सुरू केला. त्यासाठी 'संस्कार संजीवनी फाऊंडेशन' ही संस्था सुरू केली.

पारधी समाज आजही वैफल्यानेच ग्रासलेला आहे. या समाजातील लोकांना आजही हाताला काम नाही. गुन्हेगारीचा शिक्का कपाळावर असल्याने समाजाकडून सतत अहवेलना केली जाते. यावर नुसता त्रागा करून उपयोगाचे नाही तर नव्या पिढीला तरी या दुष्टचक्रातून बाहेर काढले पाहिजे या उद्देशाने परमेश्वर काळे यांनी ही संस्था सुरू केली. पारधी समाजात पती तुरूंगात असलाने संसाराची वाताहात होते. पत्नी व मुले वणवण भटकत असतात. उपासमार आणि अंधःकारमय भविष्य सोबतीला अंधश्रध्दा आणि वाईट चालीरितींचं जोखड. अशा अनेक कारणांनी हा समाज अधिकच खोल गर्तेत सापडत गेला. परमेश्वर काळे या युवकाने शिक्षण आणि संस्कारातून आपल्या समाजाला घडविण्याचे व्रत घेतले. पुण्यातील सरकारी नोकरी सोडून समाजातील या निरागस बालकांना ज्ञानाचा प्रकाश देण्याचे ठरवले. रस्त्यांवर, पालांवर, पेढ्यांवर दऱ्याखोऱ्यांमध्ये फिरून या पारधी दाम्पत्यांची मुलं एकत्र केली. सोलापुरातील मुळेगांव येथे 'संस्कार संजीवनी' संस्थेचा निवासी आश्रम सुरू केला. ५ ते १६ वयोगटातील ५८ पारधी मुले तिथे शिक्षण घेतायत. भविष्यातील योजना : संस्थेसाठी जागा, आश्रमासाठी इमारत आणि बालवाचनालय सुरू करायचे आहे. सन २०१४ साली या संस्थेला 'स्व. सुभाष रावजी शहा स्मृति' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. चित्रपट दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

संस्थेचे नाव : संस्कार संजीवनी फाऊंडेशन

पत्ता : आदिवासी पारधी विद्यार्थी आश्रम, दामले वस्ती, मुळेगांव रोड, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर.

संपर्क : परमेश्वर काळे (९८८१५५९४१६, ८९९९८२३१८७)

नोंदणी वर्ष : २०१२, नोंदणी क्रमांक : महा–७६/२०१२/एफ २३१०३

बँकेचे नाव व खाते क्रमांक : बँक ऑफ इंडिया (०७०६१०११००१०२४२)

आयएफएससी कोड : BKID0000706

वेबसाईट : http://sanskarsanjivani.org.in/wp/

ई मेल : sanskarsanjivani@gmail.com



# ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान

अंध आणि अपंग... या घटकांकडे समाज कायमच उपेक्षित म्हणून पाहत आला आहे. हे दोन्ही घटक नेहमीच समाजाकडून घेणारे मानले जातात. पण त्यांच्यातील प्रतिभेचा उपयोग करून त्यांना सक्षम बनविल्यास ते स्वतःच्या पायावर उभे राहू शकतात. इतकेच नव्हे तर समाजाकडून घेणाऱ्यांऐवजी समाजाला देणारे बनू शकतात. लातूर जिल्ह्यातील हरिश्चंद्र सुडे यांनी ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून ही गोष्ट खरी करून दाखविली आहे.

लातूर जिल्ह्यातील डांगेवाडी (ता. शिरूर अनंतपाळ) या छोट्याशा गावात १९५४ मध्ये गरीब सालगड्याच्या घरात जन्मलेले हरिश्चंद्र बाबूराव सुडे हे एका डोळ्याने अंध आहेत. गेल्या २९ वर्षांपासून ते बुधोडा (ता. औसा) येथे स्थापन केलेल्या ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून निराधार अंधांना जगण्याचा आधार देण्याचे काम करताहेत. या कार्यात त्यांच्याप्रमाणेच एका डोळ्याने अंध असणारी त्यांची पत्नी सविता सुडे या सहकार्य करतात. हे प्रतिष्ठान आता दीनदुबळ्या अंधांचा आधार तर बनले आहेच, शिवाय या केंद्रामार्फत त्यांना रोजगाराचे साधनही मिळत आहे.

हरिश्चंद्र सुडे यांच्या शैक्षणिक वाटचालीत अनेक अडथळे आले. २ ऑक्टोबर १९६९ रोजी गांधी जयंतीदिनी त्यांनी महात्मा गांधी यांच्या आचार-विचारांचा प्रचार व प्रसार करण्याची शपथ घेतली आणि त्यासाठी पूर्णवेळ काम करण्याचा संकल्प केला. १९७० मध्ये दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत स्वकष्टावर शिकून त्यांनी बी.ए.ची पदवी मिळवली आणि डांगेवाडीतील पहिला पदवीधर होण्याचा मानही मिळवला. १९७६ मध्ये ते पुण्याला गेले. या काळात त्यांचा संपर्क शिरूभाऊ लिमये, डॉ. दादा गुजर, यदुनाथ थत्ते यांच्याशी आला. १९७७ मध्ये पुण्यातील अंधजन मंडळ या संस्थेच्या व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात राहून विविध व्यवसायाचे प्रशिक्षण त्यांनी घेतले.

अंध, अपंगांना योग्य तांत्रिक कौशल्य व प्रशिक्षण दिल्यास ते समाजावर ओझे न ठरता स्वावलंबी व स्वाभिमानी जीवन जगू शकतात, हे तेथे त्यांच्या लक्षात आले. १९७७ ते ८० या काळात पुण्यातील बिबवेवाडीमधील रामनगर झोपडपट्टीत राहून तेथील कागद, काच व पत्रा गोळा करणाऱ्या मुलांसाठी बालसंस्कार वर्गही त्यांनी चालविले. त्याचवेळी डी.एड.चेही शिक्षण पूर्ण केले. या तीन वर्षांत आलेल्या अनुभवांवरून ग्रामीण भागात अशाच प्रकारचे काम सुरू केल्यास गावातच रोजगार मिळून शहराकडे येणारे बेरोजगारांचे लोंढे थांबतील, असा विचार त्यांनी केला.



महात्मा गांधी यांच्या खेड्याकडे चला या संदेशानुसार श्री. सुडे आणि त्यांच्या मित्रांनी १९८० मध्ये ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठानची स्थापना केली. उजेड (ता. शिरूर, अनंतपाळ) या गावात त्यांनी 'अफार्म'च्या सहकार्याने एका झोपडपट्टीत हातमागावर कापड विणकाम उद्योग प्रशिक्षण केंद्र, मागासवर्गीयांचे बँड पथक, कोळी समाजाच्या नागरिकांसाठी मत्स्य व्यवसाय संस्था, दोर व दोरखंड व्यावसायिक संस्था उभी केली आणि दोनशे लोकांना रोजगार मिळवून दिला. त्यात २५ अंध-अपंगांचा समावेश होता, मात्र सुडे दांपत्याच्या या कामाला ग्रामस्थांनी विरोध सुरू केला. त्यामुळे काही कारणास्तव उजेड येथील सामाजिक उपक्रम बंद करून सुडे दांपत्य बुधोडा (ता. औसा जि. लातूर) येथे आले. १९८५ मध्ये २५ अंध-अपंगांचा हा संसार सुडे दांपत्याने पुन्हा उभारला.

महात्मा गांधी यांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या हरिश्चंद्र सुडे यांनी ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान अंध-अपंगांच्या जीवनात नवचैतन्य निर्माण केले आहे. बुधोडा येथे आलेल्या अंधांची निवास व भोजनाची व्यवस्था ते करतात. त्यातील अनेकांचे विवाहही सुडे दांपत्याने लावून दिले. बुधोडा येथील प्रकल्पात वृक्षसंवर्धन व पर्यावरणाशी बांधील राहण्यावर भर दिला जातो. सिंथेटिक जुन्या साड्या, जुने कपडे यांच्यापासून प्रशिक्षित अंध व्यक्ती हातमागावर पिशव्या, सतरंज्या, चटया बनवितात. अंध व्यक्तींचा ऑर्केस्ट्राही बनविण्यात आला असून त्यांच्यामार्फत संगीताच्या माध्यमातून सामाजिक आणि पर्यावरणाशी संबंधित उपाययोजनांचा जागर केला जातो. 'सहानुभूती नको..संधी द्या' या तत्वानुसार येथील अंध-अपंग बांधव स्वकष्टाने ताठ मानेने आयुष्य जगत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन औरंगाबाद, पुणे, लातूर येथील अनेक संस्थांनी त्यांचा सन्मान केला आहे.

मानव वेदना मुक्ती केंद्र :

ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठानच्या कार्याची दखल घेऊन प्रिसिजन फाऊंडेशनने २०१५ सालचा प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार देऊन गौरव केला. संस्थेच्या कार्याचं महत्व आणि उपयोगिता लक्षात घेऊन या संस्थेला ठोस आर्थिक पाठबळ देण्याचा निर्णय प्रिसिजनने घेतला. भविष्यातील कार्यविस्तारासाठी संस्थेने प्रिसिजनकडे आर्थिक मदतीसाठी प्रस्ताव दिला. त्यास अनुसरून प्रिसिजन आणि ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान यांच्यात एक सामंजस्य करार करण्यात आला. २४ ऑगस्ट २०१७ रोजी हा करार झाला. ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठानच्या कार्यविस्तारासाठी कायमस्वरूपी पक्की इमारत बांधून सर्व सोयींनी युक्त असे मानव वेदना मुक्ती केंद्र निर्माण करणे, उपचार करणाऱ्या दृष्टीहीनांना उपचाराचे प्रशिक्षण देणे आदी गोष्टींच्या पूर्ततेसाठी हा करार करण्यात आला. त्याअंतर्गत बुधोडा येथे 'मानव वेदना मुक्ती केंद्र' सुरू झाले.

१६ मार्च २०१८ रोजी या केंद्राचा शुभारंभ झाला. या केंद्राच्या माध्यमातून महाराष्ट्रातील दृष्टीहीनांना ॲक्युप्रेशर व मसाज तसेच निसर्गोपचार पद्धतीबाबत



प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे अंध-अपंग बांधवांना तर रोजगार मिळतोच शिवाय सोलापूर, लातूर परिसरातील रूग्णांनाही आरोग्यसेवा मिळते. बुधोडा येथील प्रकल्पातील प्रशिक्षित अंध मसाज थेरपीस्ट पूर्वी घरोघरी जाऊन रूग्णांना आरोग्यसेवा देत होते. मानव वेदना मुक्ती केंद्रामुळे रूग्णांसाठी निवासाची सोय झाली आहे. एकावेळी १० महिला व १० पुरूष याप्रमाणे एकूण २० रूग्णांना या केंद्रात राहून निसर्गोपचार घेता येतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच ॲक्युप्रेशर, रिफ्लेक्सॉलॉजी, मसाज, पंचव्यंग चिकित्सा, ओपन जिम, आरोग्याशी निगडीत नैसर्गिक उत्पादने या सुविधा उपलब्ध आहेत. उद्घाटनापासून मे २०१८ पर्यंत २५८ महिला व २७५ पुरूष याप्रमाणे एकूण ५३४ रूग्णांनी आरोग्यसेवेचा लाभ घेतला आहे. टप्प्याटप्प्याने या प्रकल्पाचा विस्तार केला जाणार आहे. आगामी काळात पाच हजारांपेक्षाही जास्त अंध-अपंग बांधवांना रोजगार मिळवून देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचे उद्दिष्ट संस्थेने ठेवले आहे.

संस्थेचे नाव : ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान
पत्ता : ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान संकुल, मु. पो. बुधोडा, ता. औसा, जि. लातूर. ४१३५२०
संपर्क : प्रशांत सुडे (९९७००२०५००, ९४२२६६३७३३, ०२३८३-२३६६११)
नोंदणी वर्ष : ६ फेब्रुवारी १९८१
सोसायटी नोंदणी क्रमांक : MHA-632/1981
बॉम्बे पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट नोंदणी क्रमांक : एफ-१७५२
बँक खाते व क्रमांक : आयडीबीआय बँक (४९७१००१०००५८७६)
आयएफएससी कोड : IBKL0000497
वेबसाईट : www.gspindia.org
ई मेल : prashantsude@gmail.com, gsp.rural@gmail.com



# व्हॉईस ऑफ व्हॉईसलेस अभियान

व्यक्त होणं हा कोणत्याही सजीव प्राण्याचा मूलभूत गुणधर्म आहे. माणसासारख्या बुद्धीमान, समूहाने राहणाऱ्या सजीवासाठी तर हा गुणधर्म म्हणजे अस्तित्वाचाच प्रश्न. व्यक्त होण्याचे अनेक पर्याय असतात पण त्यापैकी सर्वात महत्वाचा पर्याय बोलता येणं. वाणी विना आयुष्य हे अंतरीच्या वेदनांना जन्म देतं. सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील शेटफळ या गावात २००२ साली अशीच एक वेदना जन्मली. मुलाच्या कर्णबधीरत्वानं मुळापासून हादरून गेलेल्या एका जोडप्यानं त्याला बोलतं करण्याचा चंग बांधला. पोटच्या गोळ्यासाठी चालविलेला हा संघर्ष नंतरच्या दहाबारा वर्षांमध्ये मुकेपणा निर्मूलनाची चळवळ बनून गेला.

कर्णबधीर बालकांना सुरूवातीपासूनच स्पीच थेरपी मिळाल्यास ती मुकी होत नाहीत. यासाठीच शेटफळ ता. मोहोळ जि. सोलापूर येथील व्हॉईस ऑफ व्हॉईसलेस अभियान ही स्वयंसेवी संस्था कार्यरत आहे. स्वतःच्या कर्णबधीर मुलावर स्पीच थेरपीद्वारे यशस्वी उपचार करणाऱ्या सौ. जयप्रदा व श्री. योगेश भांगे यांनी ही संस्था सुरू केली.मूकेपणा निर्मूलन हाच या संस्थेचा उद्देश आहे. भांगे दांपत्याला २००० साली प्रसून हा मुलगा झाला. दीड वर्षाचा झाल्यानंतर तो कर्णबधीर असल्याचं त्यांना कळालं. दुःखाचा डोंगर कोसळल्यानंतरही त्यांनी मुलाला बोलतं करण्याचा निर्धार केला. कर्णबधीरत्वाचं अचूक निदान करणाऱ्या बेरा टेस्टच्या रिपोर्टनुसार प्रसून हा ९० टक्के कर्णबधीर होता. त्यानंतर सोलापूरातील डॉ. विद्याधर बोराटेंच्या सल्ल्याने भांगे दांपत्याने पुण्याच्या के.ई.एम. रूग्णालयातील अरूणा सांगवीकर यांच्याकडे धाव घेतली. डॉ. सांगवीकर यांनी प्रभात रोडवरील डॉ. अलका हुदलीकर यांची स्पीच थेरपी घेण्याचा सल्ला दिला. '१००० मुलांमागे दहा मुलं कर्णबधीर असतात' असं सांगत डॉ. हुदलीकरांनी श्रवणयंत्र वापरण्याचा सल्ला दिला. त्यांच्याकडे स्पीच थेरपी सुरू झाली. त्यासाठी सतत शेटफळ ते पुणे प्रवास सुरू झाला. तब्बल दहा-अकरा महिन्यांच्या अथक प्रयत्नांनंतर यश दिसायला लागलं. आवाजाला, सूचनांना प्रसूनचा प्रतिसाद वाढायला लागला. एके दिवशी खेळताना तो पडला आणि त्याच्या तोंडातून आई असा शब्द बाहेर पडला. भांगे दांपत्यासाठी हा परमोच्च आनंदाचा क्षण होता. शब्द, वाक्य, उच्चारता येणारी अक्षरं, एखादा प्रसंग नीटपणे पाहणं, त्या प्रसंगाचं वर्णन कसं करायचं हे ऐकायला शिकणं, मगच बोलणं... हे सारं मनापासून सुरू झालं. या चिकाटीचं फळ दिसायला लागलं. कर्णबधीरत्वावर मात करून प्रसून इतर सर्वसामान्य मुलांप्रमाणे जिल्हा परिषदेच्या शाळेतच शिकला. शैक्षणिक चमक दाखवत असतानाच तो संवादातही कुठेही कमी पडला नाही. तो दिलखुलासपणे प्रश्न विचारतो आणि



अगदी सामान्य जीवन जगतो.

कर्णबधीर मुलाला बोलतं करण्यासाठी केलेले अथक प्रयत्न, श्रम, वेळ २००५-०६ च्या सुमारास सार्थकी लागल्याचं दिसायला लागलं. यामुळं आनंदून गेलेल्या भांगे दांपत्यानं मुलांच्या या समस्येमुळं हतबल झालेल्या पालकांना दिशा दाखवण्याचा संकल्प सोडला. कॉक्लिअर इन्प्लांटसारख्या महागड्या व विनाकारण केल्या जाणाऱ्या शस्त्रक्रिया, खिशाला न परवडणारी श्रवणयंत्रे, चुकीचे समुपदेशन, जाहिरातबाजीमुळे होणारी फसवणूक अशा दुष्टचक्रात अडकणारे अनेक पालक भांगे दांपत्याच्या दृष्टीस पडले होते. कर्णबधीर मुलावर उपचार करण्यासाठी प्रचंड खर्च येतो अशा गैरसमजातून अनेक पालक स्पीच थेरपीचा पर्याय पडताळून पाहत नाहीत. त्याऐवजी मुलाला सरळ मूकबधीर शाळेत दाखल करून मोकळे होतात. समाजातले हे वास्तविक चित्र भांग दांपत्याने जवळून पाहिले होते. अशा पालकांचे प्रबोधन करण्याचा निश्चय त्यांनी केला. त्यातून व्हॉईस ऑफ व्हॉईसलेस अभियानचा २००९ साली जन्म झाला. संस्थेचं काम पूर्वी शेटफळमधील एका झाडाखाली चालत होते. जिल्हाभरातील कर्णबधीर मुलांचे पालक भांगे दांपत्याच्या मार्गदर्शनासाठी तेथे येत असत. पालकांशी संवाद साधण्यासाठी तसेच मुलांवर उपचार करण्यासाठी संस्थेला इमारतीची उणीव जाणवत होती. ही समस्या सोडविण्यासाठी भांगे दांपत्याने ऑगस्ट २०१६ मध्ये मुकेपणा निर्मूलन केंद्राच्या उभारणीचा प्रस्ताव प्रिसिजनकडे दिला होता. प्रिसिजनने दिलेल्या रूपये २० लाख इतक्या निधीच्या बळावर शेटफळ येथे व्हॉईस ऑफ व्हॉईसलेसची एक भव्य, देखणी वास्तू उभी राहिली आहे. २८ सप्टेंबर २०१७ रोजी जागतिक कर्णबधीर दिनाचे औचित्य साधत या इमारतीचा उद्घाटन समारंभ पार पडला. बोलवाडी असे या प्रकल्पाचे नाव आहे.

भविष्यात बोलवाडी प्रकल्पाचा विस्तार केला जाणार आहे. कर्णबधीर मुलांच्या पालकांचे समुपदेशन हे संस्थेच्या कामाचा सगळ्यात महत्वाचा भाग आहे. त्या दृष्टीकोनातून पालकांसाठी समृद्ध वाचनालय उभारण्याचा संस्थेचा मानस आहे. शेटफळ परिसरातील स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थी, बचत गट, शेतकऱ्यांना त्याचा फायदा होऊ शकतो. तसेच आत्मविश्वास वाढविणारे, मनाला उभारी देणारे अद्ययावत केंद्र म्हणून बोलवाडीचा विकास करण्याचे भांगे दांपत्याचे स्वप्न आहे. तसेच परगावाहून येणाऱ्या बालकांना स्पीच थेरपी घेणे सुलभ व्हावे यासाठी निवासाची व्यवस्थाही साकारली जाणार आहे. उपलब्ध जागेमध्ये दहा कुटुंबांना राहता येईल अशी निवास व्यवस्था उभारता येऊ शकते. तसे झाल्यास दरवर्षी ३६ बालकांना स्पीच थेरपीचे शिक्षण घेता येईल. कर्णबधीरांच्या शिक्षणासाठी जिल्ह्यात मोड्यूलची उभारणी करण्याचाही प्रयत्न आहे. त्याअंतर्गत कर्णबधीर बालकांना कमी वयात शोधून बोलायला शिकविण्यापर्यंतच्या विविध टप्प्यांचा अभ्यास केला जाईल. तसेच प्रत्यक्ष अशा काही बालकांसोबत सातत्याने तीन वर्षं



काम करून त्याबाबतचा अहवाल शासनाला सादर केला जाईल.

व्हॉईस ऑफ व्हॉईसलेस अभियानच्या कार्याची दखल घेऊन २०१५ सालचा स्व. सुभाष रावजी शहा स्मृति पुरस्कार देण्यात आला. ज्येष्ठ अभिनेते सचिन खेडेकर यांच्या हस्ते भांगे कुटुंबियांनी हा पुरस्कार स्वीकारला. तसेच नाशिक येथील आदर्श कर्णबधीर सेवा पुरस्कार २०१६, बारामती येथील अनंतराव पवार सामाजिक पुरस्कार २०१७ आदींनीही संस्थेचा गौरव झाला आहे.

महाराष्ट्र राज्याचे अपंगकल्याण आयुक्त (पुणे) डॉ. नितीन पाटील तसेच मुंबईतील एका सामाजिक कार्यक्रमात नोबेल पुरस्कार विजेते कैलाश सत्यार्थी यांनीही व्हॉईस ऑफ व्हॉईसलेस अभियानची माहिती घेत शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे नाव : व्हॉईस ऑफ व्हॉईसलेस अभियान
पत्ता : शेटफळ ता. मोहोळ जि. सोलापूर. ४२३३२४
संपर्क : जयप्रदा भांगे (९९२२०६०५९९, ९८५०१५१५४१)
नोंदणी क्रमांक : एफ २०५६४
नोंदणी वर्ष : ६ मार्च २००९
बँकेचे नाव व खाते क्रमांक : बँक ऑफ बडोदा (०४३९०१००००५२९८)
आयएफएससी कोड : BARB0MODNIM
वेबसाईट : voiceofvoiceless.org.in
ई मेल : yogeshkumar.bhange25@gmail.com



# ज्ञानप्रबोधिनी हराळी प्रकल्प

भूकंपासारख्या विनाशकारी पर्वानंतर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये हराळी (ता. लोहारा, जि. उस्मानाबाद) येथील ज्ञान प्रबोधिनीचा प्रकल्प उभा राहिला. भूकंपानंतर केवळ मदतकार्य म्हणून सुरू झालेलं हे काम आज केवळ महाराष्ट्रात नव्हे तर देशभरात मॉडेल प्रोजेक्ट ठरावे इतके मोठे झाले आहे. जेवळीच्या पुढे उजव्या रस्त्याने आत गेलं की वृक्षराजींमधून डोकावणारा ज्ञान प्रबोधिनीचा सुवर्णकलश नजरेस पडतो. त्याच्या आसपास सौरउर्जेच्या तबकड्याही चमकताना दिसतात. अत्यंत देखणी वास्तू, विचारपूर्वक केलेली वृक्षलागवड, आटोपशीर रस्ते, जागोजागी सूचनाफलक, पाहावे तिकडे कामात गुंतलेले हात, यासोबत आपलेपणाचा सुगंध, विनम्रतेने होणारं स्वागत हे सगळं पाहताक्षणी आपण या प्रकल्पाच्या प्रेमात पडतो.

हराळीच्या ज्ञान प्रबोधिनीचं आजचं हे मोहून टाकणारं रूप पाहिलं की त्याच्या पाठीमागच्या अपार कष्टाची, निस्सीम निष्ठेची आणि अपरंपार ध्येयासक्तीची जाणीव व्हायला लागते. ३० सप्टेंबर १९९३ च्या विनाशकारी भूकंपानं मराठवाड्यातली हराळीसारखी अनेक गावं आणि माणसं जमीनदोस्त झाली. भूकंपामुळे मनं आणि घरं दोन्ही उन्मळून पडली. किडूकमिडूक संसारही उद्ध्वस्त झाले. अशात ज्ञान प्रबोधिनी आणि डॉ. व. सी. तथा अण्णा ताम्हणकरांच्या रूपानं या गावाला जणू देवदूतच भेटला. डॉ. ताम्हणकर आणि डॉ. स्वर्णलता भिशीकर यांनी हराळी आणि परिसरातल्या नारंगवाडी, तोरंबा, हिप्परगा इत्यादी गावांमध्ये पुनर्वसनाच्या कामाला सुरूवात केली. त्यात वैद्यकीय केंद्राचंही काम होतं. डॉ. रवींद्र पुजारी, डॉ. मुकुंद राय, डॉ. सुनीता आराध्ये, डॉ. सुशीला पाटील, डॉ. माधवी पुजारी, डॉ. भालेराव ही डॉक्टर्स मंडळी दर रविवारी सकाळी हराळीला जायची आणि संध्याकाळी परत यायची. भूकंपामुळे पडलेल्या घरांचं डबर काढणं, पत्र्याच्या शेड्स उभारणं या कामात सोलापूरच्या ज्ञान प्रबोधिनीतलया दुसरीपासूनच्या मुलांनी भाग घेतलेला आहे. छोटे-मोठे मिळून साठ-सत्तर जण दिवसभर काम करायचे. ज्ञान प्रबोधिनीचे हे विस्मयजनक, अथक काम पाहून आनंदित झालेल्या श्री. परमेश्वर कस्तुरे यांनी ९ एकर जागा ज्ञान प्रबोधिनीस बक्षीस दिली. त्यातूनच या नंदनवनाचा श्रीगणेशा झाला.

२००० साली डॉ. अण्णा ताम्हणकर हे हराळीला राहायला गेल्यानंतर या प्रकल्पाच्या कामाने मोठी गती घेतली. तिथे खेड्यांतल्या तरूणांसाठी कृषी-तंत्र निकेतन उभं राहिलं. निवासी गुरूकुलासाठी उत्तम वास्तूमंदिर उभं राहिलं. पस्तीस एकरांवर चिंच, पेरू, बोरं, लिंबू यांची ६००० फळझाडं डुलू लागली. हराळीची फळं विकायला सोलापूरला शाळेत ठेवलेली असायची. मुलं आणि पालक कधी फळं येतात म्हणून



वाट पाहायचे. शेतीशी संबंधित वेधशाळा, सौर उर्जेचे कल्पक, उपयुक्त प्रयोग, संगणक प्रयोग शाळा, पवन-सौर अशी हायब्रीड जोडणी असे अनेक प्रयोग ज्ञानप्रबोधिनीमध्ये होऊ लागले. डॉ. स्वर्णलता भिशीकर यांच्या पुढाकारातून राज्य आणि देशभरातील चांगली माणसं या प्रकल्पाला जोडली गेली.

जून १९९४ पासून ज्ञान प्रबोधिनीत प्रशिक्षित झालेल्या तरूण कार्यकर्त्यांनी हराळीचं काम आपल्या मजबूत, अनुभवी खांद्यांवर घ्यायला सुरूवात केली. भारतीय नौदलाच्या आण्विक पाणबुड्यांवर वीस वर्षं काम करून, तेथून स्वेच्छानिवृत्ती घेऊन कमांडर अभिजित कापरे आले. त्यांच्या पत्नी प्रा. गौरी कापरे यांनी पुण्याच्या शेती महाविद्यालयातून एमएस्सी ही पदव्युत्तर पदवी मिळवली होती. फलोद्यान विद्या हा त्यांचा विशेष अभ्यासाचा विषय. साहजिकच हराळीच्या कृषी-तंत्र निकेतनची आणि फलोद्यान विभागाची जबाबदारी त्यांच्याकडे आली. अश्विन भोंडवे हा डॉ. अभय बंग यांच्याकडे गडचिरोलीला तीन वर्षं काम करून आलेला संगणक अभियंता त्यांच्या पाठोपाठ हराळीला आला. त्याची इंजिनिअर बहीण कल्याणी आणि तिचा इंजिनिअर जोडीदार अनिरूद्ध पाटील हे सुद्धा हराळीच्या कामासाठी दाखल झाले. इंग्लंडमध्ये व्यवस्थापन शास्त्राचं पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या अनिरूद्धसह सर्वच तरूण कार्यकर्ते जोमाने कामाला लागले. हराळीतील शिक्षणाचे आणि ग्रामविकासाचे प्रयोग त्यांनी गावागावांमध्ये नेले.

ज्ञान प्रबोधिनीने भूकंपानंतर तातडीची आवश्यकता म्हणून घर संसार उभे करून दिले. कपडेलत्ते दिले. अनेक ठिकाणांहून अनेक प्रकारची मदतही आली असेल. पण खरी गरज होती ती मूलभूत आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची. अनेक आव्हानांना तोंड देत इथे ज्ञान प्रबोधिनीची निवासी शाळा सुरू झाली. मराठवाड्याच्या मातीत रूजली. आज जवळपास तीनशेच्या वर मुले शिक्षण घेताहेत. सगळी ग्रामीण भागातली.

हराळीच्या या शाळेतली मुलं जितकी कबड्डी, खो-खो, मल्लखांब, कुस्ती अशा मैदानी खेळांमध्ये रमली तितकीच संगणक, संगीत, विज्ञान, तंत्रज्ञानामध्येही रूची घेऊ लागली. अभ्यासाबरोबरच कलागुणांना वाव मिळू लागला. विज्ञान प्रदर्शनांमध्ये इथली मुलं नंबर पटकावू लागली. इथे केवळ शिस्तीचा बडगा नाही तर ती पाळण्यासाठीची उत्स्फूर्तताही आहे. केवळ पठडीतला अभ्यास एके अभ्यास नाही, मुलांना मुक्तपणे फुलण्यासाठी पोषक वातावरणही आहे. निवासी विद्यालयात केवळ सहनिवास नाही, मायेचा स्पर्शही आहे. संस्कृतीचा आंधळा स्वीकार नाही, त्याला विज्ञानाची साथ आहे. इथली मुलं संस्कृत पाठांतरात जेवढी अग्रेसर आहेत तितकीच स्पोकशन इंग्लिशमध्येही. हे घडू शकलं ते ज्ञान प्रबोधिनीमुळेच.

काळाची आवश्यकता म्हणून इथे कृषी पदविका सुरू करण्यात आली. केवळ एक अभ्यासक्रम सुरू करायचा म्हणून नव्हे तर या भागातल्या शेतकऱ्यांनाही आधुनिक शेतीचा स्पर्श व्हावा, शेतीचं नवं तंत्र शिकायला मिळावं म्हणून. ६० एकरांच्या



विस्तीर्ण क्षेत्रात जवळपास सहा-सात हजार फळझाडांची लागवड केली आहे. काजू केवळ कोकणातच येतात, हा समज खोटा ठरवत मराठवाड्याच्या काळ्या रानातही काजू पिकवून दाखवले. लिंबू, आवळा, चिंच, आंबा, सीताफळ अशा अनेक फळांची केवळ लागवडच नव्हे तर त्याही पुढे जाऊन फळप्रक्रिया उद्योग सुरू केला. गुणवत्तापूर्ण उत्पादनातून पुणे-मुंबईच्या ग्राहकांची वाहवा मिळवली. रोपवाटिका, गांडूळ खतनिर्मिती, फळप्रक्रिया उद्योग, कांदा चाळ, जलपुनर्भरण अशा अनेक उपक्रमांची या कृषी अभ्यासक्रमाला जोड दिलेली आहे. या प्रकल्पामुळे हराळी गावातील अनेकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. तसंच युवक आणि महिलांच्या कौशल्यालाही वाव मिळाला आहे.

प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार :

ज्ञानप्रबोधिनी हराळी प्रकल्पाचे अतुलनीय कार्य लक्षात घेऊन या प्रकल्पाला २०१६ सालचा प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार देण्यात आला. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व बालसाहित्यिक राजीव तांबे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

संस्थेचे नाव : ज्ञान प्रबोधिनी सोलापूर (हराळी केंद्र)
पत्ता : मु. हराळी, पो. तोरंबा, ता. लोहारा, जि. उस्मानाबाद. ४१३ ६०४
संपर्क : अभिजित कापरे (८८८८८०२६३८, ८८८८८०२६५०)
नोंदणी वर्ष : १९५३
नोंदणी क्रमांक : एफ १५/सोलापूर
बँक खाते व क्रमांक : ॲक्सिस बँक (२६६०१०१०००२०४०२)
आयएफएससी कोड : UTIB0000266
वेबसाईट : www.jpharali.org
ई मेल : abhijit.kapre@gmail.com



# सर फाऊंडेशन

स्टेट इनोव्हेशन अँड रिसर्च फाऊंडेशन अर्थात सर फाऊंडेशन या संस्थेची स्थापना २००६ मध्ये सोलापूरात झाली. सिद्धाराम माशाळे, बाळासाहेब वाघ, अनंत बावधनकर, सुधीर नाचणे या धडपड्या शिक्षकांनी यासाठी पुढाकार घेतला. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. कृ. शे. मार्डीकर यांच्या स्मृतिदिनी सर फाऊंडेशनची औपचारिक सुरूवात झाली. बारा वर्षांमध्ये इवल्याशा रोपट्याचे रूपांतर वटवृक्षामध्ये झाले आहे. प्राथमिक शिक्षणातील अध्ययन-अध्यापन पद्धतीमध्ये येणाऱ्या समस्यांवर मार्ग काढण्याचे काम सर फाऊंडेशन करते. शिक्षकांसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून त्याचा फायदा विद्यार्थ्यांना कशा पद्धतीने होईल, यावर सर फाऊंडेशनचा कटाक्ष असतो.

संस्थेची स्थापना झाल्यानंतर सुरवातीला अनंत अडचणींना तोंड द्यावे लागले. राज्यभर नेटवर्क वाढविण्याचे आव्हान होते. मात्र त्यामध्ये यश आले. चार-पाच शिक्षकांच्या पुढाकारातून सुरू झालेली ही संस्था आता हजारो शिक्षकांपर्यंत पोहोचली आहे. याच्या कार्याची सुरवात राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळेने झाली. त्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव, एससीआरटीचे तत्कालीन संचालक अनिल बेडगे, आयआयएमचे प्रा. विजय शेरीचंद, डॉ. अजयकुमार लोळगे, सुमन शिंदे यांनी पुढाकार घेतला होता. शासनाचे शिक्षणविषयक नवनवीन उपक्रम, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र, अभ्यासक्रम निर्मिती, पाठ्यपुस्तक लेखनाच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षणास पूरक असे काम सर फाऊंडेशनतर्फे केले जात आहे. तसेच उपक्रमशील, धडपडणाऱ्या शिक्षकांना प्रेरणा देणे, त्यांनी केलेल्या शैक्षणिक प्रयोगांची दखल घेणे, त्यांची माहिती इतरांना करून देणे, कार्यशाळेच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण उपक्रमांची व शैक्षणिक प्रयोगांची देवाणघेवाण करणे, संशोधन करणे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविणे, गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करणे, समाजाला शिक्षकांच्या कार्याची माहिती करून देणे अशा विविध पातळ्यांवर सर फाऊंडेशन कार्यरत आहे. या सर्व गोष्टी करत असताना फाऊंडेशनच्या केंद्रस्थानी आहे तो म्हणजे विद्यार्थी !

सर फाऊंडेशनने शिक्षकांसाठी राज्यभर नेटवर्क उभे केले आहे. त्यामुळे सरकारी शाळांमधील वातावरण बदलण्यास खूपच मदत होत आहे. महाराष्ट्र राज्याचे शिक्षण विभागाचे मुख्य सचिव श्री. नंदकुमार यांनीही सर फाऊंडेशनच्या कामाचे कौतुक केले. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अहमदाबाद, महाराष्ट्र राज्याचा शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्यात करार झाला आहे. त्यानुसार 'एज्युकेशन इनोव्हेशन बँक' हा प्रोजेक्ट महाराष्ट्र राज्यात सुरू आहे. शिक्षकांनी केलेल्या शैक्षणिक प्रयोगांची ही बँक असणार आहे. त्यातील सुमारे ३०००



प्रयोग ु.ळपीहेव.ीस/ळपर्पीरींळेप या लिंकवर उपलब्ध आहेत. यासाठी आयआयएमची स्थानिक पार्टनर म्हणूनही सर फाऊंडेशन सक्रिय आहे.

सिंहगड इन्स्टिट्यूट, लोणावळा (जि. पुणे) येथे झालेल्या सर रतन टाटा एज्युकेशनल इनोव्हेशन कॉन्फरन्स या राष्ट्रीय स्तरावरील शिक्षण परिषदेतून सर फाऊंडेशनने आपल्या कामाची सुरूवात केली. त्यानंतर वटवृक्ष देवस्थान ट्रस्ट भक्तनिवास, अक्कलकोट येथे प्रयोगशील शिक्षकांची राज्यस्तरीय परिषद यशस्वीरित्या पार पाडली. अशाच प्रकारे सोलापूर व जयसिंगपूर येथेही परिषदा घेण्यात आल्या. नवोपक्रम लेखनासाठी कोल्हापूर, सोलापूर, यवतमाळ, नागपूर, ठाणे, रायगड, उस्मानाबाद, पुणे येथे कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. डी.एड. व बी.एड. च्या विद्यार्थ्यांसाठी कृतीसंशोधन प्रकल्प, सुंदर हस्ताक्षरासाठी 'अक्षरमित्र' हे राज्यस्तरीय संमेलन, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अभियानाअंतर्गत विविध कार्यशाळा व शिक्षण परिषदांचे आयोजन असे अनेक उपक्रम सर फाऊंडेशनने आजवर राबविले आहेत.

माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, गुजरात सरकारचे प्रधान सचिव डॉ. पांडीयन यांनीही सर फाऊंडेशनमधील उपक्रमशील शिक्षकांचे कौतुक केले होते. सर फाऊंडेशनचे कोअर कमिटी सदस्य संदीप गुंड (पाष्टेपाडा जि. ठाणे) यांना डिजिटल स्कूल संकल्पनेबद्दल सृष्टी सन्मान या राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. सर फाऊंडेशनचे राज्य समन्वयक श्री. बाळासाहेब वाघ, सौ. हेमा शिंदे-वाघ यांना केंद्र तसेच राज्य पातळीवरील आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सर फाऊंडेशनच्या कामाचा ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेवर सकारात्मक परिणाम झाला. सरकारी शाळांमधील औदासिन्य संपुष्टात आले. गुणवत्तावाढ झाली. पटसंख्या वाढली. विद्यार्थ्यांमध्ये आमूलाग्र बदल झाले. त्यांची शाळेतील उपस्थिती वाढायला लागली. शाळांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. शिक्षकांमधील संवाद वाढला. माहितीची देवाणघेवाण वाढली. शिक्षकांमधील संशोधनवृत्तीला चालना मिळाली. नवे शैक्षणिक प्रयोग होऊ लागले. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्याचा सर्वांगीण विकास करण्याच्या दिशेने शाळा झटू लागल्या.

प्रिसिजनचा ई लर्निंग प्रकल्प :

प्रिसिजन फाऊंडेशनने आपल्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अर्थात सीएसआर निधीअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या तसेच महापालिकेच्या शाळांमध्ये ई लर्निंग प्रकल्प राबविण्याचे धोरण २०१६ मध्ये आखले होते. त्याअंतर्गत शाळांना इंटरॲक्टिव्ह प्रोजेक्टर, डिजिटल अभ्यासक्रम, सोलर पॅनल असा संच देण्यात येणार होता. प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेड ही कंपनी वाहनउद्योग क्षेत्राशी निगडीत उत्पादक कंपनी असल्याने तिचा शिक्षण क्षेत्राशी जवळून संबंध आलेला नव्हता. त्यामुळे लाभार्थी शाळा निवडायच्या कशा असा प्रश्न होता. त्यासाठी सर



फाऊंडेशनचे मोलाचे सहकार्य झाले. सर फाऊंडेशनशी सोलापूर जिल्ह्यातील बहुतांश शाळा व त्यातील शिक्षक जोडले गेलेले आहेत. त्यामुळे ई लर्निंग किट हाताळू शकतील असे तंत्रस्नेही, धडपडे शिक्षक कोणत्या शाळेत आहेत याची इत्थंभूत माहिती सर फाऊंडेशनकडे होती. त्यामुळे लाभार्थी शाळा निवडणे प्रिसिजन फाऊंडेशनला सोपे गेले. ई लर्निंग किट द्यायचे की नाही हे निश्चित ठरविण्यासाठी प्रिसिजन फाऊंडेशनची टीम शाळांना प्रत्यक्ष भेट देत असे. त्यासाठी सर फाऊंडेशनची मोठीच मदत झाली. जिल्ह्यातील सर्व शाळांची वस्तुस्थिती, पटसंख्या, शिक्षकांची इच्छाशक्ती अशा सर्व बाबी सर फाऊंडेशनला माहित होत्या. शाळांचे तालुकानिहाय सर्व्हेक्षण प्रिसिजन फाऊंडेशनच्या टीमने केले. कोणत्या दिवशी किती शाळांना भेट द्यायची याचे नियोजन सर फाऊंडेशनने केले. शाळाभेटीच्या वेळी त्यांचेही प्रतिनिधी सोबत असायचे. संबंधित शाळांमधील तंत्रस्नेही शिक्षकांना प्रिसिजनच्या संपर्कात आणले. याचा परिणाम म्हणून २०१६–१७ व २०१७–१८ या वर्षांत १०१ शाळांना ई लर्निंग किट प्राप्त झाले. किटचे इन्स्टॉलेशन करण्यासाठी, शिक्षकांना वापरण्यासंबंधी मार्गदर्शनपर कार्यशाळांचे आयोजन करण्यासाठीही सर फाऊंडेशनने योगदान दिले आहे. याचा परिणाम म्हणून सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील डिजिटल एज्युकेशनचे वारे वाहताना दिसून येत आहेत.

संस्थेचे नाव : स्टेट इनोव्हेशन अँड रिसर्च (सर) फाऊंडेशन
पत्ता : १३०, कुलस्वामिनी धनश्री नक्षर, विजापूर रोड, सोलापूर.
संपर्क : सिद्धाराम माशाळे(९९२१८२४०७६), बाळासाहेब वाघ (७०२०७८२१८१)
नोंदणी वर्ष : १९ फेब्रुवारी २००६
नोंदणी क्रमांक : एम.एच.१४३० / एफ१८२९२/०७
बँक खाते व क्रमांक : आयडीबीआय बँक (०४१०१०४०००००७४३४२)
आयएफएससी कोड : IBKL0000410
वेबसाईट : www.sirfoundation.in
ई मेल : sirfoundationmh@gmail.com




# जीवनज्योती महिला बचतगट

अक्कलकोट तालुक्यातील जेऊर हे काशीविश्वेश्वराचे शिवलिंगाचे ठिकाण. पण हेच ठिकाण आता आणखी एका कारणासाठी महाराष्ट्रात प्रसिध्दीस आलेले आहे. आपापल्या गावातील महिलांचे आरोग्य आणि स्वच्छता या विषयात क्रांती घडवून आणू पाहणाऱ्या समाजसेविकांची फौज या ठिकाणी तयार होतेय. 'जीवनज्योती महिला बचत गट' नावाने सुरू झालेल्या इथल्या संस्थेने इतिहास घडवला. 'निर्मल' नावाने सॅनिटरी नॅपकिन्स बनवून महिला उद्योजकेतेचे आदर्श उदाहरण तरी घालून दिलेच शिवाय, ग्रामीण भागातील महिलांना मासिका पाळीच्या संदर्भात जागृती निर्माण करून या दिवसात घ्यावयाच्या स्वच्छतेचे धडेही दिले. या चळवळीमागे उभ्या आहेत त्या सौ रूपाली कणमुसे!

जेऊरच्या काशीलिंग मंदिरालगतच एका छोट्र्या शेडमध्ये 'निर्मल' सॅनिटरी नॅपकिन्सच्या उत्पादनाची सुरूवात झाली. दररोज १२०० नॅपकिन्सचं उत्पादन केलं जायचं. अत्यंत व्यवसायिक पध्दतीने हे काम चालतं. गावातल्या महिला कर्मचारी कारखान्यात आल्या की, अंगावर निळा गणवेश चढवतात. मास्क, टोपी परिधान करतात आणि आपापली ठरलेली कामे करू लागतात. कोणी वुड पल्पचे स्पिनिंग करतं, कुणी प्रेसिंग, मोल्डींग, कुणी पॅडला एका बाजुला स्टीकर लावणे, गठ्ठे बांधणे सर्व कामे सराईतपणे केली जातात. सॅनिटरी पॅडची ही बंडले 'निर्मळ' ब्रॅण्डने विकली जातात. हे विकण्यासाठी पुन्हा गावातल्याच महिला पुढाकार घेतात. शिक्षिका, महिला दुकानदार, महाविद्यालयीन मुली आणि बचतगटाच्या बायका यात पुढाकार घेतात. थेट घरपोच विक्री हे या व्यवसायाचं वैशिष्ट्य.

सौ. रूपाली आणि ईरण्णा कणमुसे हे दाम्पत्य या फॅक्टरीचे व्यवस्थापन बघतात. रूपाली या पूर्वी घरच्या शेतात राबायच्या. ईरण्णा हे विहीरी फोडण्यासाठी सुरूंग लावण्याच्या कामावर असायचे. चुणचुणीत स्वभावाच्या सौ. रूपाली यांनी स्वतःचा बचत गट स्थापन केला. त्यातून अनेक कामे करायला सुरूवात केली. त्यातूनच ही संधी चालून आली. अपार कष्टाने आणि धडपडीने त्यांनी या संधीचे सोने केले. पती ईरण्णा कणमुसे यांनीही तितकीच मोलाची साथ दिली. आज हे दोघे सॅनिटरी नॅपकिनच्या लघुउद्योग क्षेत्रातले रोल मॉडेल ठरले आहेत. या एका संधीतून अनेक संधी सौ. रूपाली यांच्यासमोर उभ्या झाल्या. कारखान्यात काम करणाऱ्या महिलांना, प्रशिक्षणाला महाराष्ट्रभरातून येणाऱ्या महिलांना त्यांनी जेवण बनवून द्यायला सुरूवात केली. स्वतःच्याच शेतातले धान्य आणि भाजीपाला. घरातल्या इतर महिलांची मदत ते ही पैसे देऊन घ्यायला सुरूवात केली. त्यामुळे घरच्या लोकांचेही पाठबळ त्यांना



मिळत गेले.

सौ. रूपाली, ईरण्णा, सुजाता अर्धाले,, माधवी बमगोंडा यांनी स्वतः कौशल्य तरी प्राप्त केलेच. शिवाय, महाराष्टातून येणाऱ्या महिलांसाठी प्रशिक्षकाची भूमिकाही ते वठवत आहेत. मुळात हा प्रकल्प सुरू झाला तो 'जलस्वराज्य' योजनेचा एक भाग म्हणून. जलस्वराज्य मोहिमेचे प्रकल्प संचालक पी वेलारासू यांनी कोलकात्याला स्वच्छता अभियानविषयक राष्ट्रीय परिषदेला गेले असता त्यांनी तिथे कलगी चंद्रशेखर नावाच्या बाईंचे महिला बचत गट विषयातील प्रेझेंटेशन पाहिले. त्याने ते भलतेच प्रभावीत झाले. सॅनिटरी नॅपकिन निर्मितीचा प्रकल्प महिला बचत गटाद्वारे चालवण्याबद्दल ते प्रेझेंटेशन होते. महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागातील महिलांना सॅनिटरी नॅपकीनचा प्रकल्प सुरू करा असे सांगणे इतके सहज सोपे नव्हते. या विषयावर ग्रामीण भागातल्या महिलांना बोलते करणेही अवघड. महाराष्ट्रातल्या सात जिल्ह्यातील निवडक १४ महिलांना घेऊन ही टीम तामिळनाडूतील त्रिचुरापल्ली येथील कलगी मॅडमचा प्रकल्प पाहायला रवाना झाली. 'साबण बनवायची फॅक्टरी बघून येतो असे घरच्यांना सांगितले. या भेटीतून महिला बऱ्याच प्रभावित होऊन आल्या. पण सगळ्या जिल्ह्यात हे काम काही आकाराला येऊ शकले नाही. जेऊरच्या ''जीवनज्योती महिला बचत गटा'ने मात्र ते काम प्रत्यक्षात उतरवले.

आता 'जीवनज्योती'च्या सदस्या या उत्पादनात इतक्या माहीर झाल्या आहेत की, त्या आता इतरांना मार्गदर्शन करतात. देशभरातील इच्छुक महिला जेऊरला येऊन ट्रेनिंग घेतात. या महिलांनी तीन दिवसाचे ट्रेनिंग मोड्यूल बनविले आहे, ट्रेनिंग किट देतात. पीपीटी, प्रोजेक्टर सहजपणे वापरतात. एका ज्योतीने अनेक ज्योती पेटवाव्यात तशा ग्रामीण भागातील या महिला स्वयंप्रकाशी होत होत इतरांना प्रकाश देत आहेत. जीवनज्योती गटाने महाराष्ट्रात सॅनिटरी नॅपकीन बनवणारा पहिला महिला गट म्हणून नावलौकिक मिळवला. २००९ पर्यंत साध्या पध्दतीनेच नॅपकिन्स बनवल्या जायच्या. पण काळाचा वेग ओळखून त्यांनी आधुनिक होण्याचा निर्णय घेतला. जलस्वराज्य आणि पंतप्रधान रोजगार योजनेच्या माध्यमातून २५ लाख असे एकूण ३२ लाख रूपयांचे कर्ज घेऊन त्यांनी आधुनिक मशिनरी घेतल्या. या प्रकल्पात एकूण १६ युनिट आहेत. एका युनिटमध्ये पाच मशिन्स आहेत. सॅनिटरी नॅपकीन्ससाठी अद्याप मोठी बाजारपेठ मिळाली नसल्याने आवश्यक तेवढ्या हजार दीड हजार नॅपकिन्सचे उत्पादन केले जाते. सर्व क्षमता वापरली गेली तर दररोज पाच हजार नॅपकिन्सचे उत्पादन आणि ४५ महिलांना रोजगार एवढी क्षमता आहे.

'जीवनज्योती'च्या रूपाने अनेक महिलांच्या आयुष्याला नवा प्रकाश लाभला आहे. महिला स्वावलंबी होतायत. राज्यभरातील अनेक जिल्ह्यांमध्ये प्रदर्शनात सहभाग घेऊन आपल्या उत्पादनाची विक्री करतायत. सॅनिटरी नॅपकिन्सच्या बरोबरीने वॉशिंग पावडर, कपड्याच्या साबणाची वडी बनवणे तसेच रेडिमेड गारमेंट असे आणखी काही




युनिट या बचतगटाच्या माध्यमातून चालवले जातात. जेंव्हा ज्या वस्तुच्या उत्पादनाची जास्त मागणी असेल त्याच्या उत्पादनावर भर दिला जातो. या सर्व प्रकल्पातील सर्व कामे महिलाच करतात. म्हणजे उत्पादन, पॅकिंग, विक्री, मार्केटींग अशा सगळ्या पातळ्यावर महिलांनी कौशल्य प्राप्त केले आहे.

प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार :

जेऊर ता. अक्कलेकाट येथील या जीवनज्योती महिला बचत गट संस्थेला सन २०१७ सालचा 'प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. तीन लाख रूपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. डॉ. विकास आमटे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

संपर्क : रूपा कणमुसे (९४२३७८७२५०), ईरण्णा कणमुसे (९४२३४६९९५१)



# महारोगी सेवा समिती

सहा दशकांपूर्वी बाबा आमटे आणि साधना आमटेंनी एका महान समाजकार्याची मुहूर्तमेढ रोवली. आज त्याचा वटवृक्ष झालाय. लाखो पीडित, दुःखी जीवांना या वटवृक्षाने प्रेमाची, आपुलकीची, स्वाभिमानाची छाया दिलीय. 'महारोगी सेवा समिती' ही १९४९ साली प्रख्यात समाजसेवक बाबा आमटे यांनी स्थापन केली. ही ना नफा तत्वावर चालणारी अशासकीय संस्था आहे. या संस्थेच्या माध्यमातून आजवर जवळपास दोन लाखाहून अधिक महारोग्यांना आणि अन्य प्रकारचे शारिरीक अपंगत्व आलेल्या लोकांवर उपचार करून त्यांना स्वावलंबी बनवलं गेलं आहे. समाजातील अत्यंत दुर्लक्षित अशा या घटकाला बाबा आमटेंनी जगण्याचं कारण दिलं, सन्मान दिला. इतकेच नव्हे तर त्यांचा आदर्श अन्य समाजाने घ्यावा एवढं सक्षम बनवलं.

स्व. बाबा आमटेंनी या संस्थेच्या कार्याची काही मूल्ये मनाशी ठरवली असावीत आणि तीच त्यांच्या जीवनात आणि कार्यात उतरली होती. कोणत्याही महारोग्याला, अपंगांना आयुष्यात उभं राहण्यासाठी 'चॅरिटी' नकोय त्यांना 'चान्स' द्या, हेच त्यांचं म्हणणं असायचं. त्यांच्या 'उरलेल्या' हातांना उत्पादक बनवलं की अर्थार्जन होईल, त्यातून ते स्वावलंबी बनतील आणि त्यातून त्यांच्या जगण्याला प्रतिष्ठा प्राप्त होईल. याचंच एक मूर्त रूप म्हणजे 'आनंदवन'! आनंदवन हे केवळ सहकारी तत्वावर वसलेलं गाव नव्हे तर महारोगी, अपंग आणि दुर्लक्षित लोकांनी स्वकष्टाने उभं केलेलं नंदनवन आहे! सहजीवन आणि शाश्वत ग्रामविकासाच्या संकल्पनेवर आधारित हे एक अत्याधुनिक खेडं म्हणजे आनंदवन!

बाबा आमटेंच्या स्वप्नातील ग्राम विकासाचा, लोकसेवेचा वारसा चालवण्यासाठी त्यांची दोन्ही मुलं डॉ. विकास आणि डॉ. प्रकाश आमटे, त्यांचं सारं कुटुंबिय आणि आता तिसरी पिढीही या कार्यात तितत्याच निरलसपणे आणि तत्वनिष्ठेने कार्यरत आहेत. 'आनंदवन' हे खऱ्या अर्थाने 'प्रयोगवन' आहे. ते तसं हेतुतः बनवलं आहे ते डॉ. विकास आमटेंनी. या विकासकार्याची काही मूलभूत तत्वे आहेत. अपवादात्मक काही तांत्रिक कौशल्य असणारी माणसे बाहेरून सोडली तर बाकी सगळ्या प्रकारची कौशल्ये ही आनंदवनात निर्माण करता आली पाहिजेत. मग ते क्षेत्र कोणतंही असो. व्यवस्थापन, अकौंटिंग, कृषि, अभियांत्रिकी, उद्योग विकास अशा सगळ्या क्षेत्रात आनंदवनात तयार झालेली 'तज्ज्ञ' मंडळी काम करतायत. स्थानिक बुध्दीमत्ता आणि कौशल्याच्या आधारेच खरा आणि शाश्वत विकास होतो. याच एक मूल्यावर हे काम गेली सहा दशकं सातत्याने वाढते आहे. दीर्घकाळ टिकले आहे. महारोग्यांची आणि अपंगांची सर्वाधिक संख्या असलेलं, समूह तत्वावर चालणारं केवळ भारतातलंच नव्हे



तर संपूर्ण जगातलं एकमेव मोठं सामाजिक कार्य असावं.

आनंदवनात चालणारी समाजकार्ये :

१. महारोगी, बहिरेपणा, मुकेपणा, अंध, अपंगांसाठी तसेच समाजातील दुर्लक्षित, उपेक्षित आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांसाठी दवाखाना चालवला जातो.

२. महारोग झालेल्या किंवा कोणत्याही आजाराने अपंगत्व आलेल्या वृध्दांसाठी वृध्दाश्रम चालवला जातो.

३. अंर्धअपंग, मुर्केबहिरेपणा असलेल्या तरूणांसाठी विज्ञान, कला, वाणिज्य, कृषि महाविद्यालये चालवली जातात. विशेष मुलांसाठी शाळा चालवल्या जातात.

४. शारिरीकदृष्ट्या विशेष तरूणांसाठी तसेच बेरोजगार तरूणांसाठी सुतारकाम, लोहारकाम, फॅब्रिकेशन, प्लंबिंग, मोटारसायकल दुरूस्ती, कारपेट मेकिंग, हातमाग, यंत्रमाग, छापखाना अशा अनेक प्रकारची कौशल्ये शिकवली जातात. जेणे करून त्यांना स्वाभिमानाने आपले पोट भरता यावे.

५. पर्यावरणाला पूरक ठरतील, ग्रामीण भागातील संसाधनांवर उभी राहू शकतील, शारिरीकदृष्ट्या अपंगांना उपयुक्त ठरतील, कमी खर्चाचे, सहजपणे कुणालाही बांधता येतील अशा प्रकारच्या घरांसाठी सातत्याने संशोधन चालू असते. निरनिराळे प्रयोग करून इर्थ घरांची निर्मिती केली जाते. कमद्द खर्चामध्ये विटा बनविण्यावर संशोधन आणि विकास केला जातो.

६. समाजातील अल्पभूधारक, दुष्काळग्रस्त शेतकरी , वृध्द, समाजातील अत्यंत दुर्लक्षित आणि आर्थिकदृष्ट्या कमजोर घटकांसाठी विविध उपक्रम आणि प्रकल्प राबवले जातात.

७. अशोकवन, सोमनाथ हे प्रकल्पही याच मूळ उद्देशाची विस्तारित रूपं आहेत. सोमनाथ हे रोगमुक्त झालेल्या हजारो महारोग्यांनी आपल्या घामातून, कष्टातून, रक्त आटवून फुलवलेलं महात्मा गांधींच्या स्वप्नातील खेडं आहे. १२५० एकरावर विस्तीर्ण पसरलेलं ४०० महारोगी कुटुंबांना सामावून घेणारं ते एक समृध्द खेडं आहे.

८. लोक बिरादरी प्रकल्प : डॉ. प्रकाश आमटेंनी सुरू केलेला हा प्रकल्प हेमलकसा येथे आहे. त्याची माहिती याच पुस्तिकेत स्वतंत्रपणे दिली आहे.

९. 'स्वरानंदवन' सारख्या उपक्रमातून अंध, अपंगांच्या कलागुणांना वाव देत व्यवसायिक स्तरावर चालणारा ऑर्केस्टॉ उभा केला.

डॉ. विकास आमटेंनी आपल्या विविध प्रयोगातून शाश्वत विकासावर भर देत अनेक प्रकल्प उभे केले आहेत. जलसंधारण, शेती, ग्रामविकास, वीज, गृहबांधणी, उद्योग, फळप्रक्रिया, शेतीपूरक उद्योग अशा कितीतरी विषयात संपूर्ण देशाला मार्गदर्शक



ठरावेत असे प्रकल्प उभे केले आहेत. या प्रकल्पांची संख्या २८ इतकी आहे. प्लास्टिकसह भंगारात जाणाऱ्या गोष्टींचा पुनर्वापर करण्याचं महत्वाचं कार्यही डॉ. विकास आमटेंच्या पुढाकारातून चालतं हे विशेष.

स्व. सुभाष रावजी शहा स्मृति पुरस्कार :

महारोगी सेवा समितीच्या माध्यमातून डॉ. विकास आमटे हे ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांचा वारसा पुढे चालवत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन २०१७ सालचा स्व. सुभाष रावजी शहा स्मृति पुरस्कार या संस्थेला देण्यात आला.

संस्थेचे नाव : महारोगी सेवा समिती
पत्ता : आनंदवन, ता. वरोरा, जि. चंद्रपूर, महाराष्ट्र. ४४२ ९१४
संपर्क : सीताकांत प्रभू, कोमल (९०११०९४६०६, +९१-९०११०९४६२६, +९१-७४४७४२४०००, +९१-९६८९३४४१११, +९१-७१७६-२८२०३४)
बँक खाते व क्रमांक : बँक ऑफ महाराष्ट्र (२०२५५७२८४३९)
आयएफएससी कोड : MAHB0000792
ई मेल : accounts@anandwan.in, sheetalamte@anandwan.in, visitors@anandwan.in, smartvillage@anandwan.in
वेबसाईट : www.anandwan.in




# अजित फाऊंडेशन : स्नेहग्राम प्रकल्प

समाजात सर्वाधिक वंचित राहिलेल्या भटक्या जमातीच्या निराश्रित, अनाथ, वंचित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विनया आणि महेश निंबाळकर हे दाम्पत्य सोलापूरच्या बार्शी तालुक्यातील कोरफळे येथे स्नेहग्राम प्रकल्पाच्या माध्यमातून शाळा चालवत आहे. स्थलांतरित व शहरात रस्त्यांवर भीक मागणारी शाळाबाह्य मुले, अनाथ, निराधार, वंचित मुले, तुरूंगात शिक्षा भोगणाऱ्या कैद्यांची मुले, लैंगिक शोषणाला बळी पडलेली मुले, दुर्लक्षित भटक्या जाती-जमातींची मुले अशांना निंबाळकर दाम्पत्याने एकाच छताखाली आणून औपचारिक शिक्षणासह कौशल्याधिष्ठित शिक्षण आणि व्यावहारिक जीवनानुभव देण्याचे व्रत स्वीकारले आहे.

बार्शीत राहणाऱ्या महेश निंबाळकर यांनी २००७ साली स्नेहग्राम प्रकल्प सुरू केला. बार्शीत मराठवाड्यातून, राजस्थान व इतर प्रांतातून आलेल्या डवरी गोसावी, शिकलगार, पारधी, पाथरवट इत्यादी स्थलांतरित, भटक्या जमातीच्या कुटुंबांतील मुले कधी काळी भीक मागायची. कचरा गोळा करायची, प्रसंगी भुरट्या चोऱ्याही करायची. अनेकांना लैंगिक शोषणाला सामोरे जावे लागायचे. या मुलांसाठी काहीतरी केले पाहिजे या भावनेतून महेश निंबाळकर यांनी २० सप्टेंबर २००७ रोजी भटक्यांची अनौपचारिक शाळा सुरू केली.

गावच्या माळरानावर पालांमध्ये राहून दररोजच्या जगण्यासाठी संघर्ष करणाऱ्या या भटक्या कुटुंबांकडे केवळ शिक्षणाचाच अभाव नव्हता, तर भयानक दारिद्र्य, व्यसन, आरोग्याचे प्रश्न, कुपोषण, अंधश्रद्धा अशा किती तरी प्रश्नांनी त्यांची मान पकडलेली होती. माढा तालुक्यात जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून नोकरीसाठी येता-जाता महेश निंबाळकर यांना बार्शी परिसरात भटक्या जमातीच्या पालांवर राहणाऱ्या या वंचित, उपेक्षित कुटुंबांचे चित्र दिसायचे. नेहमीच हे चित्र पाहताना निंबाळकर अस्वस्थ होत होते. डी. एड. चा अभ्यासक्रम पूर्ण करताना त्यांनी समाजसेवेची आवड जोपासली होती. एकदा लातूरला जात असताना बार्शी परिसरात भटक्या कुटुंबांच्या पालांभोवती २५-३० मुले दिसली. अर्थात ती सर्व मुले शाळाबाह्यच होती. भटक्या जमातीची कुटुंबे दोनचार महिने एका ठिकाणी पाला टाकून राहतात आणि नंतर तेथून दुसरीकडे निघून जातात. बार्शी भागात पुढे भटक्यांच्या पालांची संख्या वाढली आणि त्याठिकाणी स्वतःचे भवितव्य नसलेली शाळाबाह्य ७५ ते १०० मुले आढळून आली. निंबाळकर यांनी एके दिवशी पालांवर जाऊन डवरी गोसावी कुटुंबियांची भेट घेतली. या समाजाचे प्रमुख सदाशिव मुळेकर हे भेटले. सोबतच बावरी समाजाचे सिताराम बावरी यांचीही भेट झाली. त्यांच्याशी निंबाळकर यांनी अनौपचारिक गप्पा मारताना




तेथील भटक्या मुलांना जवळच्या शाळेत शिक्षणासाठी पाठविण्याची सूचना केली. त्याला दोघांनीही प्रतिसाद दिला. त्यानंतर निंबाळकर यांनी अहवाल तयार केला. शासन दरबारी पत्रव्यवहार केला. या प्रक्रियेत सहा-सात महिन्यांचा कालावधी गेला. परंतु या मुलांना शाळेत सामावून घेताना त्यांच्या वास्तव्याचा काळ तीन-चार महिन्यांसाठीच असल्याने शाळेतील विद्यार्थी पटावर घेण्याचा प्रश्न होता. परंतु पटावर न घेता या भटक्या मुलांना त्यांच्या तीन-चार महिन्यांच्या वास्तव्य काळापुरते शाळेत सामावून घेण्याचा आग्रह निंबाळकर यांनी धरला. जेणेकरून निदान तेवढ्या काळापुरते तरी या भटक्या मुलांना शिक्षणासोबत शालेय पोषण आहाराचा लाभ मिळू शकेल. शेवटी या प्रयत्नांना यश आले आणि ही मुले जवळच्या शाळेत जाऊ लागली. दुसरीकडे निंबाळकर यांनी शाळेच्या सुट्टीच्या दिवशी पालांवर जाऊन मुलांची शिकवणी घेण्यास सुरूवात केली. यात त्यांनी जवळच्या शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांची मदत घेतली. दोन विद्यार्थ्यांना निंबाळकर यांनी स्वखर्चाने मानधन देऊन भटक्या मुलांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. नंतर त्यातूनच भटक्यांच्या शाळेची संकल्पना पुढे आली. मात्र त्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागला. घरच्या मंडळींनी प्रखर विरोध केला. 'महेश वाया गेला' असे बोलही कुटुंबातील सदस्यांच्या कानावर येऊ लागले. या दरम्यान निंबाळकर यांचा विवाह झाला. शेजारच्या परांडा तालुक्यातील विनया डी.एड. झालेल्या तरूणीशी त्यांचे लग्न झाले. लग्नानंतर महेश यांचा निर्णय आणखी दृढ झाला. विनया यांनीही त्यांना साथ दिली.

सुरवातीला सहा-सात महिने शिक्षण देताना पालांवरील भटक्या मुलांमध्ये अपेक्षित परिणाम दिसून आले नाहीत. त्यानंतर शिकविण्याच्या पद्धतीत केलेल्या बदलांनंतर मुलांमध्ये प्रगती दिसून आली. या वंचित मुलांची बार्शीतील भगवंत विद्यालयात शिक्षणाची सोय केली. अनौपचारिक शिक्षणानंतर औपचारिक शिक्षणाचे पुढचे पाऊल आरंभले गेले. त्यासाठी पर्याय म्हणून निवासी शाळा सुरू करण्याबाबत महेश यांनी विचार सुरू केला. २०१४ मध्ये त्यांनी शासनाकडे निवासी शाळेचा प्रस्ताव सादर केला. जून २०१५ मध्ये खांडवी येथे पहिल्यांदा निवासी शाळा सुरू झाली. परंतु वर्षभरातच दुप्पट भाडेवाढीमुळे स्थलांतरित होण्याची वेळ आली. एव्हाना घरच्यांचा विरोध झुगारून महेश निंबाळकर यांनी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकाच्या नोकरीचा राजीनामा दिला. पत्नी विनया यांनाही जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक शिक्षक पदाची नोकरी चालून आली होती. मात्र नियुक्तीपत्र हातात पडूनही त्यांनी नोकरीकडे पाठ फिरवली. इतकेच नव्हे तर अंगावरचे दागिने काढून पती महेश यांना दिले. त्यातून कोरफळे येथील माळरानावरील तीन एकर जमीन खरेदी केली आणि स्नेहग्राम प्रकल्पाला सुरवात झाली. डॉ. विकास आमटे व कौस्तुभ आमटे यांच्या कार्याची दखल घेतल्यानंतर प्रकल्प उभारणीसाठी आवश्यक असलेली संसाधने देण्याचा निर्णय



# डॉक्टर फॉर बेगर्स

भिकारी... किती सहजपणे हा शब्द उच्चारला जातो. कोण असतो हा भिकारी ? गोड आंबा खावून झाल्यावर उकिरड्यावर फेकलेली कोय... झिजेपर्यंत वापरून झाल्यावर तुटली की, रस्त्यावर भिरकावलेली चप्पल... संपूर्ण रस काढून झाल्यावर चिपाड झालेला, टाकून दिलेला ऊस. संपूर्ण स्वार्थ साधून झाल्यानंतर आपल्याच माणसांनी घरातून हाकलून दिल्यानंतर जन्मतो तो म्हणजे भिकारी !

रस्त्यावर खितपत पडलेल्या अशा भिक्षेकऱ्यांसाठी डॉ. अभिजित सोनवणे आणि सौ. डॉ. मनिषा सोनवणे हे दांपत्य महाराष्ट्रातील पुणे येथे 'डॉक्टर फॉर बेगर्स' या संस्थेच्या माध्यमातून कार्यरत आहे. या संस्थेच्या माध्यमातून ते रस्त्यावर, मंदिर-मशीदीच्या बाहेर बसणाऱ्या बेघर भिकाऱ्यांना प्राथमिक आरोग्यसेवा पुरवतात. इतकेच नव्हे तर त्यांच्यापर्यंत पोचून आस्थेने त्यांची चौकशी करून त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न करतात. कुटुंबापासून दुरावलेल्या, कुणीही वाली नसलेल्या, जगण्याचा संघर्ष करणाऱ्या भिक्षेकऱ्यांसाठी सोनवणे दांपत्य हे सोहम ट्रस्टच्या माध्यमातून देवदूत बनून काम करत आहेत.

ज्या भिक्षेकऱ्यांना रस्त्यावर आरोग्यसेवा देणे अशक्य असते त्यांना सोहम ट्रस्ट या नोंदणीकृत संस्थे मार्फत सार्वजनिक किंवा खाजगी इस्पितळांमध्ये आरोग्यसेवा देण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र भिक्षेकऱ्यांना केवळ आरोग्यसेवा देणे इतकाच संस्थेचा हेतू मर्यादित नाही. या माध्यमातून त्यांचं पुनर्वसन करण्याचा कसोशीनं प्रयत्न केला जातो. त्यासाठी भिक्षेकरी आणि त्यांचे कुटुंब यांच्यातील नातं पुन्हा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो. कौटुंबिक आधार पुन्हा मिळवून दिल्यानंतर त्यांचे समुपदेशन करून त्यांना भीक मागण्यापासून परावृत्त केले जाते. भिक्षेकऱ्यांना स्वतःच्या पायावर उभं करणं हा संस्थेचा मुख्य उद्देश आहे.

याच हेतून सोनवणे दांपत्य दररोज सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत पुण्यातील विविध मंदिरे, मशीदी आणि चर्च यांना भेट देते. भिक्षेकऱ्यांशी संवाद साधून त्यांची आरोग्य तपासणी करून त्यांच्यावर आवश्यक ते औषधोपचार केले जातात. १ एप्रिल २०१७ पासून ४३ वयोवृद्ध भिक्षेकऱ्यांना भीक मागण्यापासून परावृत्त करण्यात यश आले आहे हे विशेष.

डॉक्टर फॉर बेगर्स या संस्थेकडे आतापर्यंत ७६१ भिक्षेकऱ्यांची नोंदणी झाली असून त्यांना संस्थेमार्फत संपूर्ण आठवडाभर आरोग्यसेवा पुरविली जाते. सोनवणे दांपत्याने आतापर्यंत दृष्टीदोष असणाऱ्या ११५ पेक्षाही अधिक भिक्षेकऱ्यांना कॅटॅरॅक्ट ऑपरेशनची सुविधा मिळवून दिली आहे. तसेच फूटपाथवर राहणाऱ्या ७ वयोवृद्ध



भिक्षेकऱ्यांना हक्काचा निवारा मिळवून दिला आहे.

सोनवणे दांपत्याचे स्वतःचे एक छोटे क्लिनिक आहे. डॉ. सौ. मनिषा सोनवणे या बहुतांश वेळ क्लिनिकसाठी देतात आणि डॉ. अभिजित सोनवणे हे केवळ सायंकाळी क्लिनिकमध्ये असतात. मिळालेल्या उत्पन्नापैकी ७० टक्के हिस्सा ते स्वतःसाठी खर्च करतात आणि उर्वरित ३० टक्के रक्कम भिक्षेकऱ्यांसाठी खर्च केली जाते. एकूण कार्याच्या तुलनेत ही रक्कम कमी असली तरी समाजाकडून मिळणाऱ्या मदतीच्या बळावर त्यांचे कार्य अव्याहतपणे सुरू आहे.

आयुष्याच्या सुरवातीला डॉ. अभिजित सोनवणे यांना त्यांच्या संघर्षाच्या काळात एका भिक्षेकरी आजोबांनी मदतीचा हात दिला होता. त्यांचं जगणं सुसह्य बनवलं होतं. त्या आजोबांचं आपल्यावर मोठं कर्ज आहे असं डॉ. अभिजित सोनवणे मानतात. त्यानंतरच्या आयुष्यात त्यांनी खूप प्रगती केली. एका आंतरराष्ट्रीय संस्थेत महाराष्ट्र प्रमुख म्हणून ते काम करायला लागले. पाच आकडी पगार मिळायला लागलो. पण त्या आकड्यांच्या बळावर आपण आजोबांचं कर्ज कणभरही चूकवू शकत नाही याची त्यांना जाणीव झाली. डॉ. सोनवणे यांनी एकच निर्धार केला. परिस्थितीमुळं जे रस्त्यावर भीक मागत आहेत त्यांना पुन्हा माणसांत आणायचं. भिक्षेकऱ्यांना कष्टकरी बनवायचं. आणि इथूनच सुरू झाला डॉक्टर फॉर बेगर्सचा प्रवास.

डॉ. अभिजित सोनवणे हे भिक्षेकऱ्यांचा डॉक्टर म्हणून जगायला लागले...त्यांच्यातलाच एक होवून. समाजाने देवादिकांनाही वार वाटून दिले आहेत. सोमवार शंकराचा, मंगळवार देवीचा/गणपतीचा, गुरूवार साईबाबांचा/स्वामी समर्थांचा/दत्तगुरूंचा, शुक्रवार अल्लाहचा, शनिवार शनिचा/मारूतीचा, रविवार प्रभू येशूचा... ज्या दिवशी ज्या देवाचा वार त्या दिवशी तिथं भक्तांची गर्दी. भक्तांची गर्दी जेवढी मोठी तितकीच भिक्षेकऱ्यांचीही संख्या मोठी.

कुणीतरी आपल्या झोळीत रूपयाचं दान टाकेल अशा अपेक्षेनं भिक्षेकरी ताटकळत असतात आणि दुसरीकडे या भिक्षेकऱ्यांना भेटण्यासाठी थांबलेले असतात. सोमवार ते शनिवार हे सहा दिवस सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत विविध प्रार्थनास्थळांच्या बाहेर दुचाकीवरून फिरतात. रस्त्यावरच औषधोपचार करतात. जे उपचार रस्त्यावर करता येत नाहीत ते शक्य असेल त्या इस्पितळातून करून घेतात. विशेष म्हणजे हे सर्व उपचार निःशुल्क असतात.

ही सगळी प्रक्रिया त्यांच्यातीलच एक बनून होत असते. त्यामुळे नकळतच भिक्षेकरी आणि डॉ. अभिजित यांच्यामध्ये एक नातं निर्माण होतं. सुरवातीला डॉक्टर आणि रूग्णाचं...मात्र नंतर अगदी बाप-मुलाचं किंवा आजोबा-नातवाचं नातं होऊन जातं. जवळपास ४०० आईबाप आणि ३०० आजीआजोबा असलेला जगातील मी एकमेव माणूस आहे, असं डॉ. सोनवणे अभिमानानं सांगतात. रस्त्यावरच्या या कुटुंबाचे आपण कुटुंबप्रमुख आहोत याचा त्यांना आनंद आहे. पण आपलं कुटुंब रस्त्यावर,




उकिरड्यावर राहतं याची खंतसुद्धा. या दुदर्शेतून, लाचारीतून त्यांना बाहेर काढून सन्मानानं जगायला शिकवणं हेच डॉ. सोनवणे यांचं खरं उद्दिष्ट आहे.

भीक मागण्यापासून परावृत्त करण्याचा त्यांचा आटोकाट प्रयत्न सुरू आहे. बसूनच करता येतील अशी कामंही ते त्यांना मिळवून देताहेत. फूटपाथवर बेवारस म्हणून गलिच्छ अवतारात पडलेल्या, आयुष्याच्या अंतिम टप्प्यात असणाऱ्या व्यक्तिंना रस्त्यावरच अंघोळ घालून, शूचिर्भूत करून वृद्धाश्रमात ठेवत आहेत. तिथं दाखल करताना त्यांच्या नावापुढं डॉ. सोनवणे हे स्वतःचं नाव लावतात. त्यामुळं देवाघरी जाताना हे भिक्षेकरी बेवारस म्हणून जात नाहीत. डॉ. सोनवणेंचं नाव घेऊन जातात आणि त्यांच्यासाठी ठेवून जातात आयुष्यभर जपण्यासाठीच्या आठवणी !

सोहम ट्रस्टतर्फे औषधांसोबतच कुबड्या, व्हीलचेअर, कमरेचे/मानेचे पट्टे यांसोबतच इतरही रूग्णोपयोगी वस्तू स्वीकारल्या जातात. लोकसहभागातून भिक्षेकऱ्यांचं पुनर्वसन होऊ शकतं यावर सोनवणे दांपत्याचा विश्वास आहे आणि याच विश्वासाच्या बळावर त्यांनी हे शिवधनुष्य उचललं आहे.

प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार :

सोनवणे दांपत्याचे कार्य लक्षात घेऊन त्यांना २०१८ सालचा प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार देण्यात आला.

संस्थेचे नाव : **सोशल हेल्थ अँड मेडिसिन (सोहम) ट्रस्ट**

पत्ता : सोनवणे क्लिनिक, पंचमुखी मारूती मंदिराजवळ, फणसे मेडिकल स्टोअरच्या वर, शिवाजीनगर गावठाण, पुणे. ४११ ००५

संपर्क : डॉ. अभिजित सोनवणे (९८२२२६७३५७)

नोंदणी क्रमांक :

बँक खाते व क्रमांक : सिंडीकेट बँक, औंध पुणे (५३४२२०१००१५३५२)

आयएफएससी कोड : SYNB0005342

ई मेल : abhisoham17@gmail.com

वेबसाईट : www.sohamtrust.com



# 'आनंदवन प्रयोगवन'ने झाली प्रिसिजन गप्पांची सांगता

## प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता आणि स्व. सुभाष रावजी शहा स्मृती पुरस्काराचे झाले वितरण

# प्रिसीजन पुरस्काराचे थाटात वितरण

## महारोगी सेवा समिती व जीवनज्योती संस्थेचा गौरव



# कुष्ठरोग्यांच्या श्रमातूनच बहरले 'आनंदवन' : डॉ. आमटे

## प्रिसिजन फाउंडेशनच्या पुरस्कारांचे वितरण





हिप्परगा तलावातील गाळ काढल्याबद्दल जलकन्या भक्ती जाधव यांचा सन्मान करताना डॉ. विकास आमटे. यावेळी डॉ. मंदार परांजपे, सुहासिनी शहा, यतीन शहा, मधुरा शहा, करण शहा तसेच सन्मानार्थी रुपाली कणमुसे आणि इरण्णा कणमुसे आदी.

# सत्कारापेक्षा सत्कार्य महत्वाचे आहे : डॉ. विकास आमटे

## प्रिसीजन गप्पा कार्यक्रमात भक्ती जाधव यांच्यासह इतरांना सामाजिक पुरस्कारांचे वितरण

प्रतिनिधी
सोलापूर, दि. १५ ऑक्टोबर -

बाबा आमटे यांनी स्वतःसाठी, कुटुंबीयांसाठी काही केले नाही. त्यांनी आयुष्यभर समाजसेवेला वाहून घेतले होते. सत्कारापेक्षा सत्कार्य महत्वाचे आहे. बाबांमुळे समाजाने फेकून दिलेल्या सामान्यांना आज आनंदवनात सन्मान मिळत आहे असे ज्येष्ठ समाजसेवक डॉ. विकास आमटे यांनी सांगितले.

प्रिसीजन गप्पा कार्यक्रमाचा रविवारी समारोप झाला. बुद्धिबळ या खेळात चमकदार कामगिरी करणारे निहार कुलकर्णी आणि स्वराली हालवळणे, सोलापूरचा पाणीसाठा वाढावा यासाठी हिप्परगा तलावातील गाळ काढण्यासाठी झटणाऱ्या जलकन्या भक्ती जाधव, व्यावसायिक रंगभूमीवर सोलापूरची पताका कायम फडकत ठेवणारे अमीर तडवळकर आणि अश्विनी तडवळकर, अत्यंत प्रतिकूल स्थितीत ज्ञानार्जनाचे काम अखंड सुरू ठेवणारे प्रयोगशील शिक्षक परमेश शेख आणि वैशाली कार्वेकर यांचा प्रिसीजन फाउंडेशनच्यावतीने ज्येष्ठ समाजसेवक डॉ. विकास आमटे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी प्रिसीजन फाउंडेशनच्या अध्यक्षा सुहासिनी शहा, यतीन शहा, करण शहा, मधुरा शहा उपस्थित होते.

जेऊर (ता. अक्कलकोट) येथील जीवनज्योती महिला बहुउद्देशीय संस्थेला डॉ. आमटे यांच्या हस्ते प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार देण्यात आला. संस्थेच्या रुपाली इरण्णा कणमुसे आणि इरण्णा कणमुसे यांनी पुरस्कार स्वीकारला. तर वरोरा येथील महारोगी सेवा समितीला स्व. सुभाष रावजी शहा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

त्यानंतर आनंदवन प्रयोगवन या विषयावर डॉ. मंदार परांजपे यांनी डॉ. आमटे यांची मुलाखत घेतली. ते म्हणाले, बाबा आमटे मार्क्सचे चाहते होते, पण मार्क्सवादी नव्हते. बाबा आमटे यांनी आमच्यासाठी काही केले नाही, त्यांनी सामान्यांसाठी आयुष्य घालविले.

बाबांचे व्यक्तिमत्व जगावेगळे होते. माझ्या आईने कुष्ठरोग्यांना लढण्याचा अधिकार दिले. आई कधी निवृत्त होत नाही. बाबांचे काम हीच आमची ओळख आहे. मी स्वतः वैद्यकीय शिक्षण असतानाही आनंदवनात अनेक प्रयोग केले. आनंदवनाकडे कुष्ठरोग वसाहत म्हणून पाहू नका तर प्रयोगवन म्हणून पाहा. बाबा कुष्ठरोग्यांना लॉर्ड आर्मी म्हणायचे. पु. ल. देशपांडे आनंदवनाला एकलव्य विद्यापीठ म्हणायचे. आम्ही आनंदवनात स्मार्ट व्हिलेजचे निर्माण केले आहे. फेकून दिलेल्या सामान्यांना आनंदवनात सन्मान मिळतो. आनंदवनात वेगवेगळ्या प्रकारचे २८ प्रकल्प आहेत. भारत जोडायचा नारा आम्ही सातत्याने देत असतो असे सांगताना दुःख ला जात, पात, धर्म नाही असेही त्यांनी स्पष्ट केले.

बाबांना पर्यावरण संवर्धनासाठी जागतिक पुरस्कार मिळाले आहे. बाबांना आजवरच्या सामाजिक कार्याबद्दल ५ कोटींचे पुरस्कार मिळाले आहेत. साधना आमटे आणि बाबा आमटे समजायला पाचशे वर्षे लागतील. आनंदवनाच्या उभारणीत सरकारचा सहभाग शून्य आहे.

## प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कारांचे थाटात वितरण

# आनंदवनातून साडेनऊ लाख कुष्ठरोग्यांवर उपचार : डॉ. आमटे



## पुणेकरांची नक्षा उतरविली




# जेऊरच्या 'तनिष्का'ला 'प्रिसिजन'चा पुरस्कार

## सामाजिक कृतज्ञता पुरस्काराने होणार गौरव; शहा स्मृती पुरस्कार महारोगी सेवा समितीला



रुपाली कणमुसे



विकास आमटे


PRECISION
FOUNDATION
Impacting Lives
Uplifting Society